| 2 | पोशि /1407 बबलू बाबाखान पठान | लोहारा | 15 | लहान भावाचे लग्ना करीता |
| 3 | मपोशि/969 अनुराधा अरूण नेहारे | यवतमाळ ग्रा | 15 | स्वत:चे लग्ना करीता |
| 4 | मपोशि/978 अश्विनी किसन खंडारे | यवतमाळ ग्रा | 15 | स्वत:चे लग्ना करीता |

तसेच नमुद पोलीस अमंलदार यांना रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याच्या अनुपालन अहवाल या कार्यालयात संबंधीत लिपीक यांचेकडे सादर करावा.

(मा. पोलीस अधिक्षक यांचे मान्यतेने)

(सुनिल हुड)
प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ

प्रति,

पो.स्टे पो.नि, उमरखेड, लोहारा, यवतमाळ ग्रा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस.

**प्रत माहितीस व कार्यवाहीस,:-** डि पी जी लिपीक , योग्य कार्यवाहीस

क्रमांक:पोअय/कक्ष-११/ कार्यासन आदेश/ 1843/२०२४
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 07 FEB 2025

## -: आदेश :-

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष १२/निलं-मुक्त/क.श्रे.लि.सिध्दीकी/१७४१/२०२५ दि.०५/०२/२०२५

**विषय :-** कनिष्ठ श्रेणी लिपीक यांच्या नेमणुकीबाबत.

---ooo---

पोलीस अधीक्षक, यवतमाळ या आस्थापनेवरील कार्यरत खालील नमुद मंत्रालयीन लिपीक यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यासनावर नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिपीक कर्मचारी यांचे नाव व पदनाम | यापुर्वीचे कार्यासन ठिकाण | नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | क.श्रे.लि. म.शफीक म.हनीफ सिददीकी | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | पो.अंमलदार वेतन लिपीक (कक्ष १८) या कार्यासनास सहायक |

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

**प्रति,**

१) क.श्रे.लि./ म.शफीक म.हनीफ सिददीकी, पो.अ.कार्यालय यवतमाळ

**प्रत** :- कार्यालय अधिक्षक/पो.उप.अधि.(मुख्या.) यवतमाळ/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/प्रमुख लिपीक आस्थापना शाखा, पत्रव्यवहार शाखा, लेखा शाखा, प्रबंधक शाखा.

# भाग - ०३

# वेतन / भत्ते / रोखिकरण

1719

क्रमांक:पोअय/कक्ष-९(७)/सुधारीत वेतन निश्चती / /२०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ,.पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : - 5 FEB 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**कार्यालयीन आदेश :-**

संदर्भ:- 1) पोअय/कक्ष-12/मयत सफौ.738/मिश्रा/गुन्हा माहिती/13988/2023 दिनांक .26/09/2023
2) मा.वि पो.म.अमरावती परिक्षेत्र,अमरावती यांचे अपील आदेश क्र.अप/कक्ष-5/यवतमाळ/अपील आदेश/से.नि.सफौ-738-मिश्रा/2024/2041,दिनांक 17/10/2024

**विषय सफौ.738/कृपाशंकर शिवदुलारे मिश्रा यांचे सुधारीत वेतननिश्चीती बाबत.**

****

सफौ.738/कृपाशंकर शिवदुलारे मिश्रा तत्कालीन नेमणुक पो.स्टे. दारव्हा यांचे उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये दिनांक.12/06/2013 ते 14/09/2016 पर्यतचा निलंबन कालावधी हा As such म्हणुन गणण्यात आला होता.मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र यांनी संदर्भ क्र.2 अन्वये सदर कालावधी हा कर्तव्य काळ म्हणुन गणण्यात आला असल्याने त्यांना सदर कालावधी वेतनवाढीचा देण्यात आलेना नाही सफौ.738/ मिश्रा यांच्या वेतनवाढी खालील प्रमाणे सुधारीत वेतननिश्चीती करण्यात येत आहे.

सफौ.738/कृपाशंकर शिवदुलारे मिश्रा यांना खालील नमुद स्तंभ-अ प्रमाणे यापूर्वी देण्यात आलेल्या वेतनवाढीमध्ये बदल करुन स्तंभ-ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुधारीत वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहे.

भाग -1

| ०६ वे वेतन आयोगानुसार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुळ आदेश | | | सुधारीत आदेश | | |
| वे.वा.दिनांक | वेतन | ग्रेड पे | वे.वा.दिनांक | वेतन | ग्रेड पे |
| ०१/०७/२०१२ | १२५३०/- | २८००/- | ०१/०७/२०१२ | 12530/- | २८००/- |
| ०१/०७/२०१३ | १२९९०/- काल्पनिक | २८००/- | ०१/०७/२०१३ | 12990/- नियमित वेतनवाढ | २८००/- |
| ०१/०७/२०१४ | १३४७०/- काल्पनिक | २८००/- | ०१/०७/२०१४ | 13470/- नियमित वेतनवाढ | २८००/- |
| ०१/०७/२०१५ | १३९६०/- काल्पनिक | २८००/- | ०१/०७/२०१५ | 13960/- नियमित वेतनवाढ | २८००/- |
| ०१/०७/२०१६ | १४४७०/- काल्पनिक | २८००/- | ०१/०७/२०१६ | 14470/-नियमित वेतनवाढ | २८००/- |

भाग -2 (07 व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतननिश्चती)

सफौ.738/कृपाशंकर शिवदुलारे मिश्रा, यांना वरील नमुद केल्याप्रमाणे सुधारित वेतनवाढी मंजूर करण्यात आल्याने त्यांचे दिनांक 01/01/2016 चे वेतनात सुधारणा झालेली आहे. त्यामुळे पोहवा/1544 श्याम राठोड, यांची दिनांक 01/01/2016 पासुन सुधारीत वेतन मॅट्रिक्स मध्ये खालील प्रमाणे सुधारीत वेतननिश्चीती, वेतन पडताळणी पथकाचे वेतन पडताळणीचे अधिन राहुन करण्यात येत आहे.

| पुर्वी घेत असलेले वेतन | | सध्या देय असलेले वेतन (सुधारीत आदेश) | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०७ वे वेतन आयोगानुसार मुळ वेतननिश्चीती<br>वेतन संरचना : 29२००-९२३०० | | ०७ वे वेतन आयोगानुसार सुधारित वेतननिश्चीती<br>वेतन संरचना : 29२००-९२३०० | | | |
| दिनांक ०१/०१/२०१६ चे मुळ वेतन १३६०० + २८०० =१६७६० x २.५७ गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- ४३०७३.२ S-10 44100 | | दिनांक ०१/०१/२०१६ चे मुळ वेतन १३६०० + २८०० =१६७६० x २.५७ गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- ४३०७३.२ S-10 44100 | | | |
| वेतनवाढीचा दिनांक | एकुण वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतन | वेतनवाढ | एकुण वेतन |
| ०१/०१/२०१६ | ४४१००/- काल्पनिक | ०१/०१/२०१६ | ४४१००/- नियमित वेतनवाढ | | |
| ०१/०७/२०१६ | ४५४००/- | ०१/०७/२०१६ | ४४१००/- | १३०० | ४५४००/- |
| ०१/०७/२०१७ | ४६८००/- | ०१/०७/२०१७ | ४५४००/- | १४०० | ४६८००/- |
| दिनांक ३१.०७.२०१७ रोजी सेवानिवृत्त | | | | | |

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति

वेतन लिपीक क्र.1 कक्ष-18 यांना व्दिप्रतीत योग्य कार्यवाहीस्तव

क्रमांक/पोअय/कक्षा-१(९)/आप्रयो पहिला लाभ/ /२०२४
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ 1763
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : - 6 FEB 2025

कार्यालयीन आदेश

सदर्भ-:- १) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर /१११९/प्र.क ०३/२०१९ सेवा-३ दिनांक ०२ मार्च २०१९
२) यवतमाळ जिल्हा समिती बैठक दिनांक २२/०९/२०२३
३) पोअय/प्रलि/कक्ष-९/आप्रयो - पहिला लाभ/१३८८९/दिनांक २२/०९/२०२३

विषयः- आश्वासीत प्रगती योजनेचा वेतननिश्चिती बाबत.

खालील पोलीस शिपाई यांना प्रत्यक्ष पोलीस नाईक पदाची पदोन्नती मिळण्यापुर्वीच त्यांनी सेवेची १० वर्ष पुर्ण केल्याने त्यांना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर /१११९/प्र.क ०३/२०१९ सेवा-३ दिनांक ०२ मार्च २०१९ नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेनुसार लाभ देण्याबाबत दिनांक २२.०९.२०२३ च्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये पात्रपात्रता तपासल्यानंतर घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सदर पोलीस अमंदार यांना **या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअय / प्रलि /कक्ष -९ आप्रयो- पहिला लाभ /१३८८९ दिनांक २२.०९.२०२३ अन्वये आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ वेतनश्रेणी एस ०८ (रु.२५२००-८११००) मध्ये मंजुर करण्यात आल्याने** खालील पोलीस अमंलदार यांची सुधारीत वेतननिश्चीती आदेशातील नमुद दिनांकापासुन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

**७व्यावेतनआयोगाप्रमाणे वेतनसंरचना**
**पोलीस नाईक (रु.२५२००-८११००)**

**पोना/२०६५ गोंविद काशिनाथ मोरे नेमनुक - पो.मु.यवतमाळ**

| ०७ वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती | | ०७ वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | | |
| मुळ आदेश | | सुधारीत आदेश | | | |
| वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढ | एकुण वेतन |
| ०१/०७/२०१७ | ३०२००/- | ०१/०७/२०१७ | ३०२००/- | ० | ३०२००/- |
| | | ०६/१०/२०१७ पासुन आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यात आल्याने पोना पदावर वेतन निश्चिती | ३०२००/- | ९००/- | ३११००/- |
| ०१/०७/२०१८ | ३११००/- | दि.०६.१०.२०१७ पासुन पोना पदावर आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ पदोन्ती वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) Level ०९ नुसार दिनांक ०१/०७/२०१८ चे वेतन ३१४००/- देय राहील. | | | |
| | | ०१/०७/२०१८ | ३१४००/- | ९००/- | ३२३००/- |
| १५/१०/२०१८ पोना पदावर पदोन्नती | ३१४००/- | १५/१०/२०१८ पोना पदावर पदोन्नती झाल्याने (आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याने वेतन निश्चीती होत नाही) | ३२३००/- | ०० | ३२३००/- |
| ०१/०७/२०१९ | ३२०००/- | ०१/०७/२०१९ | ३२३००/- | १०००/- | ३३३००/- |
| ०१/०७/२०२० | ३३०००/- | ०१/०७/२०२० | ३३३०० | १०००/- | ३४३००/- |
| ०१/०७/२०२१ | ३४०००/- | ०१/०७/२०२१ | ३४३००/- | १०००/- | ३५३००/- |
| ०१/०७/२०२२ | ३५०००/- | ०१/०७/२०२२ | ३५३००/- | ११००/- | ३६४००/- |
| ०१/०७/२०२३ | ३६१००/- | ०१/०७/२०२३ | ३६४००/- | ११००/- | ३७५००/- |
| ०१/०७/२०२४ | ३७२००/- | ०५/०१/२०२४ पोहवा पदावर पदोन्नती (S-९ नुसार) | ३७५००/- | ०० | ३७६०० /- ( S-९) |
| | | ०१/०७/२०२४ नियमीत वेतन वाढ | ३७५००/- | ११००/- | ३८६००/- |
| | | ०१/०७/२०२४ विकल्प दिल्याने वेतन वाढ | ३८६००/- | १२००/- | ३९८००/- |
| | | पोहवा पदावर पदोन्नाती वेतनसंरचना २६४००-८३६०० (S-९) Level १४ नुसार ३९९००/- देय राहील | | | |
| पुढील वेतनवाढ देय दिनांक ०१/०७/२०२५ राहील | | | | | |

पोना/२१६७ सुरज दिलीपराव साबळे - यवतमाळ शहर

| ०७ वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती | | ०७ वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | | |
| मुळ आदेश | | सुधारीत आदेश | | | |
| वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढ | एकुण वेतन |
| ०१/०७/२०१७ | २९३००/- | ०१/०७/२०१७ | २९३००/- | ०० | २९३००/- |
| | | ०४/१२/२०१८ पासुन आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यात आल्याने पोना पदावर वेतन निश्चिती | २९३००/- | ९००/- | ३०२००/- |
| ०१/०७/२०१८ | ३०२००/- | दि.०४/१२/२०१८ पासुन पोना पदावर आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ पदोन्न्ती वेतन संरचना:- २५५००-८११००(S-०८) Level ०९ नुसार दिनांक ०१/०७/२०१८ चे वेतन ३०५००/- देय राहील. | | | |
| | | ०१/०७/२०१८ | ३०५००/- | ९००/- | ३१४००/- |
| ०७/०२/२०१९ पोना पदावर पदोन्नती | ३१४००/- | ०७/०२/२०१९ पोना पदावर पदोन्नती झाल्याने (आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याने वेतन निश्चीती होत नाही) | ३१४००/- | ०० | ३१४००/- |
| ०१/०७/२०१९ | ३११००/- | ०१/०७/२०१९ | ३१४००/- | ९००/- | ३२३००/- |
| ०१/०७/२०२० | ३२०००/- | ०१/०७/२०२० | ३२३००/- | १०००/- | ३३३००/- |
| ०१/०७/२०२१ | ३३०००/- | ०१/०७/२०२१ | ३३३००/- | १०००/- | ३४३००/- |
| ०१/०७/२०२२ | ३४०००/- | ०१/०७/२०२२ | ३४३००/- | १०००/- | ३५३००/- |
| ०१/०७/२०२३ | ३६४००/- | ०१/०७/२०२३ | ३५३००/- | ११००/- | ३६४००/- |
| ०१/०७/२०२४ | ३८७००/- | ०५/०१/२०२४ पोहवा पदावर पदोन्नती (S-९ नुसार) | ३६४००/- | ०० | ३६५०० /- ( S-९) |
| | | ०१/०७/२०२४ नियमीत वेतन वाढ | ३६४००/- | ११००/- | ३७५००/- |
| | | ०१/०७/२०२४ विकल्प दिल्याने वेतन वाढ | ३७५००/- | ११००/- | ३८६००/- |
| पोहवा पदावर पदोन्नाती वेतनसंरचना २६४००-८३६०० (S-९) Level १४ नुसार ३८७००/- देय राहील | | | | | |
| पुढील वेतनवाढ देय दिनांक ०१/०७/२०२५ राहील | | | | | |

पोना/२२०७ प्रशांत उध्दवराजी गेडाम - यवतमाळ शहर

| ०७ वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती | | ०७ वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | | |
| मुळ आदेश | | सुधारीत आदेश | | | |
| वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढ | एकुण वेतन |
| ०१/०७/२०१७ | २९३००/- | ०१/०७/२०१७ | २९३००/- | ०० | २९३००/- |
| | | ०४/१२/२०१८ पासुन आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यात आल्याने पोना पदावर वेतन निश्चिती | २९३००/- | ९००/- | ३०२००/- |
| ०१/०७/२०१८ | ३०२००/- | दि.०४/१२/२०१८ पासुन पोना पदावर आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ पदोन्न्ती वेतन संरचना:- २५५००-८११००(S-०८) Level ०९ नुसार दिनांक ०१/०७/२०१८ चे वेतन ३०५००/- देय राहील. | | | |
| | | ०१/०७/२०१८ | ३०५००/- | ९००/- | ३१४००/- |
| ०७/०२/२०१९ पोना पदावर पदोन्नती | ३०५००/- | ०७/०२/२०१९ पोना पदावर पदोन्नती झाल्याने (आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याने वेतन निश्चीती होत नाही) | ३१४००/- | ०० | ३१४००/- |
| ०१/०७/२०१९ | ३११००/- | ०१/०७/२०१९ | ३१४००/- | ९००/- | ३२३००/- |
| ०१/०७/२०२० | ३२०००/- | ०१/०७/२०२० | ३२३००/- | १०००/- | ३३३००/- |
| ०१/०७/२०२१ | ३३०००/- | ०१/०७/२०२१ | ३३३००/- | १०००/- | ३४३००/- |
| ०१/०७/२०२२ | ३४०००/- | ०१/०७/२०२२ | ३४३००/- | १०००/- | ३५३००/- |
| ०१/०७/२०२३ | ३५०००/- | ०१/०७/२०२३ | ३५३००/- | ११००/- | ३६४००/- |
| ०१/०७/२०२४ | ३८७००/- | ०५/०१/२०२४ पोहवा पदावर पदोन्नती (S-९ नुसार) | ३६४००/- | ०० | ३६५०० /- ( S-९) |
| | | ०१/०७/२०२४ नियमीत वेतन वाढ | ३६४००/- | ११००/- | ३७५००/- |
| | | ०१/०७/२०२४ विकल्प दिल्याने वेतन वाढ | ३७५००/- | ११००/- | ३८६००/- |
| पोहवा पदावर पदोन्नाती वेतनसंरचना २६४००-८३६०० (S-९) Level १४ नुसार ३८७००/- देय राहील | | | | | |
| पुढील वेतनवाढ देय दिनांक ०१/०७/२०२५ राहील | | | | | |

पोना/२२६२ सचिन दिनीपराव डाहाके - पो.स्टे. नेर

| ०७ वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती | | ०७ वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | | |
| मुळ आदेश | | सुधारीत आदेश | | | |
| वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढ | एकुण वेतन |
| ०१/०७/२०१७ | २९३००/- | ०१/०७/२०१७ | २९३००/- | ०० | २९३००/- |
| | | ०४/१२/२०१८ पासुन आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यात आल्याने पोना पदावर वेतन निश्चिती | २९३००/- | ९००/- | ३०२००/- |
| ०१/०७/२०१८ | ३०२००/- | दि.०४/१२/२०१८ पासुन पोना पदावर आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ पदोन्न्ती वेतन संरचना:- २५५००-८११००(S-०८) Level ०९ नुसार दिनांक ०१/०७/२०१८ चे वेतन ३०५००/- देय राहील. | | | |
| | | ०१/०७/२०१८ | ३०५००/- | ९००/- | ३१४००/- |
| ०७/०२/२०१९ पोना पदावर पदोन्नती | ३०५००/- | ०७/०२/२०१९ पोना पदावर पदोन्नती झाल्याने (आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याने वेतन निश्चीती होत नाही) | ३१४००/- | ०० | ३१४००/- |
| ०१/०७/२०१९ | ३११००/- | ०१/०७/२०१९ | ३१४००/- | ९००/- | ३२३००/- |
| ०१/०७/२०२० | ३२०००/- | ०१/०७/२०२० | ३२३००/- | १०००/- | ३३३००/- |
| ०१/०७/२०२१ | ३३०००/- | ०१/०७/२०२१ | ३३३००/- | १०००/- | ३४३००/- |
| ०१/०७/२०२२ | ३४०००/- | ०१/०७/२०२२ | ३४३००/- | १०००/- | ३५३००/- |
| ०१/०७/२०२३ | ३५०००/- | ०१/०७/२०२३ | ३५३००/- | ११००/- | ३६४००/- |
| ०१/०७/२०२४ | ३८७००/- | ०५/०१/२०२४ पोहवा पदावर पदोन्नती (S-९ नुसार) | ३६४००/- | ०० | ३६५०० /- ( S-९) |
| | | ०१/०७/२०२४ नियमीत वेतन वाढ | ३६४००/- | ११००/- | ३७५००/- |
| | | ०१/०७/२०२४ विकल्प दिल्याने वेतन वाढ | ३७५००/- | ११००/- | ३८६००/- |
| | | पोहवा पदावर पदोन्नाती वेतनसंरचना २६४००-८३६०० (S-९) Level १४ नुसार ३८७००/- देय राहील | | | |
| पुढील वेतनवाढ देय दिनांक ०१/०७/२०२५ राहील | | | | | |

पोना/२३०२ सुषमा पंजाबराव अनभोरे - पो.स्टे. उमरखेड

| ०७ वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती | | ०७ वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | वेतन संरचना:-२५५००-८११००(S-०८) | | | |
| मुळ आदेश | | सुधारीत आदेश | | | |
| वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढिचा दिनांक | वेतन | वेतन वाढ | एकुण वेतन |
| ०१/०७/२०१७ | ३०२००/- | ०१/०७/२०१७ | ३०२००/- | ०० | ३०२००/- |
| | | १९/०९/२०१७ पासुन आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यात आल्याने पोना पदावर वेतन निश्चिती | ३०२००/- | ९००/- | ३११००/- |
| ०१/०७/२०१८ | ३११००/- | दि.१९/०९/२०१७ पासुन पोना पदावर आश्वासीत प्रगती योजनेचा पहिला लाभ पदोन्न्ती वेतन संरचना:- २५५००-८११००(S-०८) Level ०९ नुसार दिनांक ०१/०७/२०१८ चे वेतन ३१४००/- देय राहील. | | | |
| | | ०१/०७/२०१८ | ३१४००/- | ९००/- | ३२३००/- |
| १५/१८/२०१८ पोना पदावर पदोन्नती | ३१४००/- | १५/१०/२०१८ पोना पदावर पदोन्नती झाल्याने (आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याने वेतन निश्चीती होत नाही) | ३२३००/- | ०० | ३२३००/- |
| ०१/०७/२०१९ | ३२०००/- | ०१/०७/२०१९ | ३२३००/- | १०००/- | ३३३००/- |
| ०१/०७/२०२० | ३३०००/- | ०१/०७/२०२० | ३३३००/- | १०००/- | ३४३००/- |
| ०१/०७/२०२१ | ३४०००/- | ०१/०७/२०२१ | ३४३००/- | १०००/- | ३५३००/- |
| ०१/०७/२०२२ | ३५०००/- | ०१/०७/२०२२ | ३५३००/- | ११००/- | ३६४००/- |
| ०१/०७/२०२३ | ३६१००/- | २१/०६/२०२३ पोहवा पदावर पदोन्नती (S-९ नुसार) | ३६४००/- | ०० | ३६५००/- |
| ०१/०७/२०२४ | ३९९००/- | ०१/०७/२०२३ नियमीत वेतन वाढ | ३६४००/- | ११००/- | ३७५००/- |
| | | ०१/०७/२०२३ विकल्प दिल्याने वेतन वाढ | ३७५००/- | ११००/- | ३८६००/- |
| | | पोहवा पदावर पदोन्नाती वेतनसंरचना २६४००-८३६०० (S-९) Level १४ नुसार ३८७००/- देय राहील | | | |
| | | ०१/०७/२०२४ | ३८७००/- | १२००/- | ३९९००/- |
| पुढील वेतनवाढ देय दिनांक ०१/०७/२०२५ राहील | | | | | |

वर नमुद पोलीस अंमलदार यांना वरिष्ठ पदाचे वेतन आकारण्यात आले असेल तर आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ देण्यात आल्याने सदरची रक्कम समायोजीत करुन वेतननिश्चितीच्या फरकाची रक्कम रोखीने देय राहील. सदरखर्च २०५५-जिल्हा पोलीस बल वेतन-०१ या लेखाशिर्षाखाली मंजुर व उपलब्ध असलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा. सदर वेतननिश्चीती वेतन पडताळणी पथक यांचे आधिन राहुन करण्यात येत असुन वेतन पडताळणी पथकाने सदर वेतननिश्चीती बाबत काही आक्षेप घेतल्यास त्यांचे निर्देनाप्रमाणे अतिप्रदान रकमेची वसुली करण्यात येईल.

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति ,

वेतन लिपीक कक्ष-१८ (४ प्रति) राज पत्र लिपीक कक्ष-१४ नोंदनी लिपीक यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव

क्रमांक:पोअय/कक्ष-२५/घरभाडे भ./ 830 /२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 07 FEB 2025

महाराष्ट्र पोलीस

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## -:आ दे श :-

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक घभाभ/प्र.क्रं. ६७/९८/सेवा-५, दिनांक २४/८/२००९ नुसार घरभाडे भत्याच्या दरात सुधारणा करण्यात आली असुन, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घ.भा./२०००/प्र.क्रं.९७/२००० सेवा-५, दिनांक १७/२/२००१ अन्वये घरभाडे भत्ता अनुज्ञप्ती शुल्कासह देण्याबाबत आदेश असल्याने मी पोलीस अधीक्षक, यवतमाळ मला वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना देय असणारा घरभाडे भत्ता मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्रं | पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | नेमणुकीचे ठिकाण पो.स्टे. | घरभाडे मंजुरीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सपोनि/राहूल समाधान वाघ | पो. स्टे. दिग्रस | दि. १९.०३.२०२४ |
| २. | पोउपनि/देवीदास विठ्ठलराव शेंडे | पो.स्टे. वडगांव जंगल | दि. १६.०८.२०२४ |
| ३. | पो.अ./१३७० सुनिल अर्जुन हगवणे | पो.स्टे. खंडाळा | दि. ११.११.२०२४ |
| ४. | सपोनि/प्रणती सुधाकर लांजेवार | उपवि कार्यालय पांढरकवडा | दि.०१.०८.२०२४ |
| ५. | पोनि/गोपाल सुधाकर उंबरकर | पो. स्टे. पुसद | दि.०४.०३.२०२४ |
| ६. | उपविभागीय अधिकारी हनुमंत अमृतराव गायकवाड | उपविभाग पो. अ. कार्यालय उमरखेड | दि.०६.०२.२०२४ |
| ७. | पोशि/रामेश्वर आधुबा ढाकणे | पो. स्टे. आर्णी | दि.२३.०८.२०२४ |
| ८. | सपोनि/प्रविण देविदास मानकर | पो. स्टे. यवतमाळ ग्रामीण | दि.०१.०२.२०२४ |
| ९. | पोउपनि/सुनिलकेशवराव अंबुलकर | पो.स्टे. पाटण | दि.१६.०८.२०२४ |
| १०. | पोनि/लहू देविदास तावरे | पो. स्टे. बाभूळगांव | दि.०४.०६.२०२४ |
| ११. | पोनि/दिप्ती गौरव व्यास | महामार्ग सुरक्षा प्रादेशिक विभाग, यवतमाळ | दि.०७.०८.२०२४ |
| १२. | मपोशि/०३ मेघा सुरेशराव फाळके | पो. स्टे. नेर | दि.२९.१०.२०२४ |
| १३. | पो.कॉ/२६३८ विजय आत्माराम पारधी | पो. स्टे. नेर | दि. ३०.११.२०२४ |
| १४. | मपोहवा२११०/कोशल्या भाउराव कुमरे | उपविभागीय कार्यालय पांढरकवडा | दि.१४.०८.२०२४ |
| १५. | पो.अ./२६५३ सचिन राजाराम भालेराव | पो. स्टे. खंडाळा | दि.०१.०५.२०२३ |

**अटी :-**

१) शासकीय निवासस्थान रिक्त झाल्यानंतर जेष्टतेनुसार निवासस्थान वाटप करुन घरभाडे भत्याची आकारणी बंद करावी.

२) घरभाडे भत्ता घेणारे पोलीस अधिकारी/कर्मचारी नेमणुकीच्या मुख्यालयाच्या नगरी हद्दीत राहावयास पाहीजे.

३) घरभाडे भत्याची मागणी करण्यात आलेल्या कालावधीत अधिकारी /कर्मचाऱ्यास निवासस्थान पुरविण्यात आलेले नसावे.

४) पोलीस कर्मचाऱ्याचे पती/पत्नी केंद्र शासन सार्वजनिक उपक्रम निमशासकीय संस्था जसे नगरपालीका/कोर्ट दुस्ट ईत्यादी यांचे मार्फत काम करीता असलेल्या ठिकाणी निवासस्थान देण्यात आले असावे.

५) ज्या निवासस्थानासासठी अधिकारी / कर्मचाऱ्याने घरभाडयाची मागणी केली आहे ते अधिकृत निवासा व्यतिरीक्त अन्य कोणत्याही कारणा करीता वापरले जात नसावे.

६) नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची मुख्यालयाबाहेर बदली झाल्यानंतर अथवा शासकीय निवासस्थान दिल्यानंतर वरील नमुद प्रमाणे घरभाडे भत्ता देय राहणार नाही व सदर बाबत प्रभारी अधिकारी यांना तात्काळ कळविण्याबाबत कार्यवाही करावी..

७) सदर अधिकारी /कर्मचारी हे निवासस्थानात वास्तव्य करुन घरभाडे भत्ता घेत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बाबत दंडनिय दराने वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,
कक्ष १८- वेतन लिपीक-१ /कक्ष १७- वेतन लिपीक-२/ डिपीजी लिपीक

प्रत :- उपवि कार्यालय पांढरकवडा / उपविभाग पो. अ. कार्यालय उमरखेड /पो. स्टे. दिग्रस /पो.स्टे. वडगांव जंगल पो.स्टे. खंडाळा /पो. स्टे. पुसद /पो. स्टे. आर्णी /पो. स्टे. यवतमाळ ग्रामीण /पो.स्टे. पाटण /पो. स्टे. बाभूळगांव महामार्ग सुरक्षा प्रादेशिक विभाग, यवतमाळ / पो. स्टे. नेर

# भाग - ०४

# बक्षिस / मानधन

निरंक

# भाग - ०५

# शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती

क्र: पोअय/कक्ष-१२/कसुरी/अंतिम आदेश/पोउपनि-झिमटे/ 1486 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 3 FEB 2025

# अंतिम आदेश

**कसुरदार :-** पोउपनि/आशिष झिमटे, तत्का. नेमणुक पो.स्टे. पोफाळी.

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/कसुरी/पोउपनि-झिमटे/कादानो/२१९७२/२०२४, दिनांक १३/११/२०२४.

**थोडक्यात कसुरी :-** :- वरिष्ठांना आठवडा डायरी सादर न करुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

**कसुरी :-**

पोउपनि/आशिष झिमटे, तुम्ही पोलीस स्टेशन पोफाळी येथे दिनांक ०६/०२/२०२४ पासुन नेमणुकीस असुन तेथे कर्तव्यावर हजर झाल्यापासुन आज पावेतो तुम्ही एकही आठवडा डायरी उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड यांना सादर केली नाही. तुम्हाला उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड यांनी आठवडा डायरी सादर करणेबाबत त्यांचे कार्यालयाचे जावक क्र. ६२८/२०२४, दिनांक २५/०३/२०२४, ८३३/२०२४ दिनांक ०४/०५/२०२४ १०५०/२०२४ दिनांक ०३/०६/२०२४, १६०६/२०२४, दिनांक ३१/०७/२०२४ अन्वये वेळोवेळी पत्र व स्मरणपत्र देण्यात आले परंतु तुम्ही सदर पत्राचे कोणतेही उत्तर अथवा आठवडा डायरी उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड यांना सादर केली नाही.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग ०३ नियम क्र. २३१ (१) (४) प्रमाणे प्रत्येक आठवडा संपताच सोमवारी आठवडा डायरी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक असतांना पोउपनि अशिष झिमटे पो.स्टे. पोफाळी तुम्ही तुमच्या कर्तव्यात कसुर केल्याचे दिसुन येत आहे. तसेच तुम्हाला वरिष्ठांकडुन आठवडा डायरी सादर करणेबाबत वांरवार सुचना देण्यात आल्या असतांना सुध्दा तुम्ही अदयाप पावेतो आठवडा डाय-या सादर केल्या नाहीत. यावरुन तुम्ही जाणीवपुर्वक वरिष्ठांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करुन अवहेलना करीत असल्याचे दिसुन येते ही बाब शिस्तप्रिय पोलीस दलास अशोभनिय आहे. तुमच्या या कृत्याचा परिणाम इतर अधिकारी यांचेवर देखील पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाप्रकारे तुम्ही तुमचे कर्तव्यामध्ये अशोभनिय, बेजबाबदारपणा व कर्तव्याप्रती प्रमाणीकपणा न ठेवता पोलीस दलाच्या शिस्तीस बाधा पोहचविणारी आहे.

उपरोक्त प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड यांचे अहवाल क्र. २११७/२०२४, दिनांक ०१/१०/२०२४ अन्वयें या कार्यालयास कसुरी अहवाल सादर केला. उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात पोलीस अधिकारी म्हणुन नेमुन दिलेल्या कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन तुम्ही उपरोक्त नमुद प्रमाणे तुमचे कर्तव्यामध्ये बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे व प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्मान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने

तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/कसुरी/पोउपनि-झिमटे/कादानो/२१९७२/२०२४, दिनांक १३/११/२०२४ अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०२/१२/२०२४ रोजी स्विकारली व दिनांक ०४/१२/२०२४ रोजी स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक २३/०१/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता आज्ञांकीत कक्षामध्ये तुम्ही सादर केलेला लेखी व मौखीक खुलासा समाधानकारक व संयुक्तीक नसल्याने तसेच तुम्ही कारणे दाखवा नोटीस चे अनुषंगाने दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये व मौखक खुलाश्यात आठवडा डायरी सादर न केल्याबाबत कबुल केल्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**पोउपनि/ आशिष झिमटे तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी सध्या पो.स्टे. पोफाळी यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोउपनि/ आशिष झिमटे,**
नेमणुक पोलीस स्टेशन पोफाळी.

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-उपविपोअ उमरखेड/पो.स्टे. पोफाळी/कक्ष-१०/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१७)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-१०** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अधिकारी यांचे सेवापुस्तकात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

1489

क्र: पोअय/कक्ष-१२/कसुरी/अंतिम आदेश/पोउपनि-घाटोळ/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 13 FEB 2025

# अंतिम आदेश

**कसुरदार :-** पोउपनि/व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवुधतवाडी.

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कसुरी/पोउपनि-घाटोळ/कादानो/२२७६७/२०२४, दिनांक ३०/१२/२०२४.

**थोडक्यात कसुरी :-** :- अप.क्र. ९३५/२०२४ कलम १०३(१) भान्यांस अन्वये दाखल गुन्हयात गंभीर स्वरुपाच्या उणीवा ठेवुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

**कसुरी :-**

पोउपनि/व्हि.ए.घाटोळ तुम्ही पो.स्टे. अवधुतवाडी येथे नेमणुकीस असुन पो. स्टे. अवधुतवाडी अप.क्र. ९३५/२०२४ कलम १०३(१) भान्यांस प्रमाणे दखल गुन्हयातील मृतक नामे रामनाथ हिरामण सोनटक्के वय ५५ वर्ष रा. कोळंब हा दिनांक १८/०८/२०२४ रोजी १९.०० वाजता बेलफुल विक्रीकरीता कमलापार्क लोहारा येथे आला असता आरोपी नामे अरुण सुरेशराव वऱ्हाटे वय ४२ वर्ष रा. कोळंबी यांने मृतकाच्या मुलाचे आरोपीचे पत्नीसोबत असलेल्या अनैतिक संबंधाचे कारणावरुन मृतकास छातीवर व पाठीवर लोखंडी चाकुने वारंवार वार करुन जिवानिशी ठार केले, अशी फिर्यादी नामे श्रीमती अंजू रामनाथ सोनटक्के वय ५० वर्ष रा. काळंबी हिने दिनांक १८/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे दिलेल्या रिपोर्टवरुन उक्त कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास तुम्ही केला आहे.

पोउपनि/व्हि.ए.घाटोळ नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी, तुम्ही तपास केलेल्या गुन्हयातील आरोपी हा दिनांक २१/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आला असून गुन्हयातील आरोपी कारागृहात बंद आहे. आरोपी कारागृहात बंद असतांना सदर गुन्हयाचा तपास करुन आरोपी विरुद्ध पुरावे विहीत मुदतीत उपलब्ध करुन गुन्हयाची निर्गती ९० दिवसाचे आत करणे अपेक्षित असतांना तुम्ही सदर गुन्हयाचा तपास मुदत पुर्ण होऊनही आजपर्यंत विनाकारण प्रलंबित ठेऊन दिनांक ३०/११/२०२४ रोजी दोषारोप पडताळणीकरीता उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय यवतमाळ येथे सादर केले. गुन्हयाचे दोषारोपपत्र तपासणीकरीता विहीत मुदत संपली असतांना उशीरा उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ कार्यालयात प्राप्त झाल्याने गुन्हयाचे दोषारोपपत्र गुणवत्ता तपासणीकरिता प्राथमिक स्तरावरील संनियंत्रण समितीकडे पाठविण्यात आले असता त्यांनी दिलेल्या त्रुटीची पुर्तता करण्यात आली आहे.

पोउपनि/व्हि.ए.घाटोळ नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी, तुम्ही गुन्हयाचे केसपेपर मध्ये चुकीच्या पद्धतीने घटनास्थळ पंचनामा केला आहे. सिडीआर/एसडीआर नोडल ऑफिसरकडून प्रमाणित केले नाही. स्ट्रेप्टेग्राफी रिपोर्ट प्राप्त केला नाही. याप्रमाणे गुन्हयाचा तपास अत्यंत निष्काळजीपणे केल्याचे निदर्शनास आले आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी संबंधीत पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना सत्र न्यायालय गुन्हयाचे दोषारोपपत्र विहीत मुदतीत वि. न्यायालयात दाखल करणे बाबत तसेच सदर गुन्हयाचे केसपेपर स्क्रुटणीकरीता १५ दिवस अगोदर त्यांचे कार्यालयास सादर करणेबाबत वेळोवेळी उपविभागीय गुन्हे सभेमध्ये तसेच कार्यालयीन दिनांक १६/०५/२०२४ चे पत्रांन्वये कळविले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ यांनी यापूर्वी सुद्धा पो.स्टे. भेटी दरम्यान गुन्हयाचे तपासिक अधिकारी यांना गुन्हयाबाबत मार्गदर्शन करुन सुद्धा गुन्हयांची निर्गती करणे अपेक्षित असतांना तुम्ही गुन्हयाचे तपास मुदत प्रमाणे निर्गतीबाबत स्वत: गंभीर नसल्याचे निदर्शनास आले आहे. एकंदरीत तुम्ही गुन्हयाचे तपासात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा दिसून येत आहे.

पोउपनि/ व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी तुम्ही गुन्हयाचे कागदपत्र विहीत मुदतीचे १५ दिवस अगोदर सादर न करता वरिष्ठांच्या आदेशाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आणि आरोपीस बचावची संधी उपलब्ध उपलब्ध करुन दिली आहे. तुमचेवर सोपविण्यात आलेले तपासाचे कर्तव्य तुम्ही योग्य रितीने पार पाडले नाही. तपासमध्ये जणीवपुर्वक अक्षम्य हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा दाखविला आहे. तसेच तुम्ही गुन्हयाची विहीत मुदतीत निर्गती न करता गुन्हे विनाकारण प्रलंबीत ठेवून तुम्ही कायदयाची तरतूद, शासन निर्णय व वरिष्ठांच्या आदेशांकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केलेले आहे.

उपरोक्त प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ यांनी त्याचे अहवाल क्र. वाफौ/७-फ/उपविपोअ-यवत/पोउपनि-घाटोळ/कसुरी/४८०८/२०२४, दिनांक ०२/१२/२०२४ अन्वयें या कार्यालयास कसुरी अहवाल सादर केलेला असुन सदर अहवालानुसार शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात तपासी अधिकारी म्हणुन तपास करतांना नेमुन दिलेल्या कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन तुम्ही उपरोक्त नमुद तपासामध्ये बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर तपास पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कसुरी/पोउपनि-घाटोळ/कादानो/२२७६७/२०२४, दिनांक ३०/१२/२०२४ अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०८/०१/२०२५ रोजी स्विकारली व दिनांक ०९/०१/२०२५ रोजी स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक २३/०१/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता आज्ञांकीत कक्षामध्ये तुम्ही सादर केलेला लेखी व मौखीक खुलासा समाधानकारक व संयुक्तीक नसल्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**पोउपनि/ व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोउपनि/ व्हि.ए.घाटोळ,**
नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-अपोअ यवतमाळ/उपविपोअ यवतमाळ/ठाणेदार, पो.स्टे. अवधुतवाडी/कक्ष-१०/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१७)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-१०** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अधिकारी यांचे सेवापुस्तकात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

1488
**क्र: पोअय/कक्ष-१२/कसुरी/अंतिम आदेश/पोउपनि-झिमटे/ /२०२५**
**कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.**
**एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ**
**पिन कोड ४४५ ००१.**
**Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in**
**दिनांक :-** 3 FEB 2025

# अंतिम आदेश

**कसुरदार :-** पोउपनि/आशिष झिमटे, तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी सध्या पो.स्टे. पोफाळी.

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/कसुरी/पोउपनि-घाटोळ/कादानो/२२५६७/२०२४, दिनांक ३०/१२/२०२४.

**थोडक्यात कसुरी :-** :- पो.स्टे. अप.क्र. ३०१/२०२३ मध्ये गुन्हयाची तिव्रता कमी करुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

**कसुरी :-**

कसुरदार पोउपनि/आशिष झिमटे, नेमणुक पो.स्टे पोफाळी तुम्ही पो.स्टे. वणी येथे नेमणुकीस असतांना तुमच्याकडे अप.क्र. ३०१/२०२३ तपास देण्यात आला असता, आरोपी संजय आत्राम याने त्याची पत्नी हिचेसोबत मृतक संदिप सिडाम यांचे अनैतीक संबध असल्याचे कारणावरुन आरोपीने मृतकास जिवे मारण्याची धमकी देवुन मनात राग धरुन मृतक संदीप सिडामला ट्रकने धडक देवुन जाणुन बुजुन जिवे मारल्याचे नमुद असुन सुध्दा तुम्ही सदर गुन्हयात दिनांक ०८/०४/२०२३ रोजी ३०४ भादवि अन्वये कलमवाढ करुन तपास करण्यात आला आहे. सदर प्रकरणात आरोपी संजय आत्राम याने त्याची पत्नी हिचे मृतक संदिप सिडाम यांचेसोबत प्रेमसंबध असल्याबाबत संशय बाळगुन आरोपीने मृतकास जिवे मारण्याची धमकी देवुन मनात राग धरुन टिप्परने जाणुनबुजुन जिवे मारण्याकरीता विरुध्द दिशेने येवुन उडवुन दिले, असे फिर्यादी व साक्षीदार यांचे बयाणात नमुद असुन सदर गुन्हयात लागलीच कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद गरजेचे होते. परंतु तुम्ही तसे न करता नमुद गुन्हयात ३०४ भादवि अन्वये कलमवाढ करुन गुन्हयाची तिव्रता कमी केल्याचे निदर्शनास येत आहे.

कसुरदार पोउपनि/ आशिष झिमटे तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी सध्या पो.स्टे. पोफाळी तुमच्याकडे दिनांक २६/०३/२०२३ रोजी गुन्हयाची केसडायरी प्राप्त झाल्यानंतर अपघातग्रस्त वाहने डिटेन केलेली असतांना सुध्दा टिप्परचे बफरवरील रक्तासारखे डाग पुराव्याकामी जप्त केले नाहीत. तसेच साक्षीदार बंडु सिडाम यांच्या बयाणा मधील हकीकत ही भादवि कलम ३०० या खुन या सदरात मोडत असतांना तुम्ही कलम ३०४ सदोष मनुष्यवधाचे कलम वाढवुन गुन्हयाची तिव्रता कमी केली आहे. अशाप्रकारे तुम्ही तुमचे कर्तव्यामध्ये अशोभनिय, बेजबाबदार व कर्तव्याप्रती प्रमाणीकपणा न ठेवता पोलीस दलाच्या शिस्तीस बाधा पोहचविणारी आहे.

उपरोक्त प्रकरणी अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे अहवाल क्र. १२२०/२०२४, दिनांक ११/०८/२०२४ अन्वयें या कार्यालयास कसुरी अहवाल सादर केला. अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात तपासी अधिकारी म्हणुन तपास करतांना नेमुन दिलेल्या कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन तुम्ही उपरोक्त नमुद तपासामध्ये बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित

परिणाम इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे व प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्मान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/कसुरी/पोउपनि-घाटोळ/कादानो/२१५६७/२०२४, दिनांक २९/१०/२०२४अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०८/०१/२०२५ रोजी स्विकारली व दिनांक ०३/१२/२०२४ रोजी स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक २३/०१/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता आज्ञांकीत कक्षामध्ये तुम्ही सादर केलेला लेखी व मौखीक खुलासा समाधानकारक व संयुक्तीक नसल्याने तसेच तुम्ही आज्ञांकीत कक्षामध्ये सदरचा गुन्हा हा ३०२ या सदराखाली असल्याचे कबुल केल्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**पोउपनि/ आशिष झिमटे तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी सध्या पो.स्टे. पोफाळी यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोउपनि/ आशिष झिमटे,**
नेमणुक पोलीस स्टेशन पोफाळी.

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-उपविपोअ उमरखेड/उपविपोअ वणी/ठाणेदार, पो.स्टे. वणी/पो.स्टे. पोफाळी/कक्ष-१०/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१७)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-१०** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अधिकारी यांचे सेवापुस्तकात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्रमांक: पोअय/कक्ष-१२/निलंबन/पोहवा-२१२ डोंगरे/ 1533 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 3 FEB 2025

## निलंबन आदेश

कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे तुम्ही पो.स्टे. वणी येथे नेमणुकीस असुन तुम्ही पो.स्टे. वणी अंतर्गत दिपक चौपाटी बिट मध्ये तैनातीस आहात. तुम्ही सिंधी कॉलनी भागात एका बारचे समोर शासकीय गणवेषामध्ये टिनाच्या खोलीत दारुच्या नशेत सोफयावर लोळलेल्या स्थितीत असल्याने काही लोकांनी मोबाईलमध्ये फोटो व व्हिडीओ शुट केला. व सदर प्रकरणाबाबत दिनांक ३०/०१/२०२५ रोजी वणी परिसरातील वणी टाईम्स या न्युज पोर्टल चे संपादक जितेद्र कोठारी यांनी बातमी प्रकाशीत केली की, "बाप रे पोलीस कर्मचारी वर्दीतच झिंगाट फोटो व्हिडीओ व्हायरल" या मथळयाखाली बातमी प्रकाशीत केली असुन सदर बातमीमध्ये तुम्ही शासकीय गणवेष परिधान करुन मदय प्राशन करुन झोपुन असलेल्या स्थितीतील फोटो प्रकाशीत झाला असुन त्या फोटोचे बाजुलाच "खाकीवर डाग वर्दीवर पोलीस झिंगाट" अशी हेडलाईन दिलेली आहे. तसेच सदर अवस्थेतील फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर तुफान व्हायरल होत आहे.

कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे, नेमणुक पो.स्टे. वणी तुम्हाला प्रभारी अधिकारी यांनी अनेकवेळा कर्तव्या दरम्यान कोणतेही व्यसन न करता कर्तव्य बजावण्याची तोंडी स्वरुपात तसेच दैनंदिन गणणेमध्ये आदेशीत केले असतांना सुध्दा तुम्ही तुमचे वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष करुन कर्तव्यावर असतांना मदय सेवन करीत आहात. तसेच सदरचे वृत्त प्रकाशीत झाल्यानंतर तुम्हाला शासकीय गणवेष परिधान करुन मदय प्राशन का केले याबाबतच विचारणा केली असता तुम्ही कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही.

कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे, नेमणुक पो.स्टे. वणी तुम्ही कर्तव्यावर शासकीय गणवेषात असतांना दारु पिवुन मदयधुंद अवस्थेमध्ये मिळुन आल्याने तसेच सदर घटनेबाबतचे फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झ ाले आहे. तुमची पोलीस विभागामध्ये दिर्घकाळ सेवा झाली असतांना सुध्दा तुम्ही शासकीय गणवेषामध्ये दारु पिवुन होते. यामुळे सामान्य नागरिकांमध्ये पोलीसांविषयी व्देषाची भावना निर्माण होवुन जनसामान्यामध्ये चुकीचा संदेश जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. तसेच सदर प्रकरणामुळे पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन होण्यास तुम्ही कारणीभुत ठरले आहात. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

तुम्ही कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे, नेमणुक पो.स्टे. वणी तुमच्या अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार, गैरवर्तनामुळे व अक्षम्य गंभीर कर्तव्यच्युतीमुळे शिस्तबध्द पोलीस दलाची प्रतिमा जनमानसामध्ये मलीन झाली आहे. तुमच्या कर्तव्यातील गंभीर कुचराई व अक्ष्यम्य कर्तव्यच्युतीच्या अनुषंगाने तुमचेविरुध्द शिस्तभंग विषयक विभागीय कार्यवाहीचे अधिन राहुन तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ च्या नियम ३(१)(अ-२) मधील तरतुदीनुसार आदेश निर्गमित दिनांकापासुन त्वरीत प्रभावाने शासकीय सेवेतुन **"निलंबीत"** करण्यात येत आहे.

असेही आदेश देण्यात येत आहेत की, प्रस्तुत आदेश अस्तित्वात असे पर्यतच्या कालावधीत कसुरदार कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे, नेमणुक पो.स्टे. वणी यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय हे **पोलीस मुख्यालय यवतमाळ** येथे ठेवण्यात येत असुन तेथे त्यांनी दररोज सकाळ संध्याकाळचे गणनेवर हजेरी दयावी. नमुद कसुरदार यांना निलंबन कालावधीत पोलीस अधीक्षक यवतमाळ यांची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

निलंबन कालावधीत कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे, नेमणुक पो.स्टे. वणी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फ व सेवेतुन काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ६८(१)(ए) नुसार (५०%) निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहील. निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी नमुद कसुरदार यांनी आगोदरच्या महिन्यात कोणत्याही प्रकारची खाजगी नौकरी अथवा धंदा केला नाही, याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

तुम्ही कसुरदार पोहवा/२१२ गजानन डोंगरे, नेमणुक पो.स्टे. वणी यांनी निलंबन कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची खाजगी नौकरी अथवा धंदा केल्यास त्यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम १६ अन्वये गैरवर्तणुक समजण्यात येईल व त्यामुळे शिस्तभंगाच्या कारवाईस ते पात्र ठरतील. याशिवाय सदर कृतीमुळे देय असलेला निर्वाहभत्ता मिळणेस ते अपात्र ठरतील.

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोहवा/२१२ गजानन डोंगरे,**
नेमणुक पोलीस स्टेशन वणी.

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वणी. (व्दीप्रतीत)**
**२/-** सदर आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत उलट टपाली या कार्यालयास परत करावी.

**प्रत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.**
**२/** सदर पोलीस अंमलदार हे निलंबन काळात मुख्यालयी हजर राहील्याबाबतचा हजेरीपटाची छायांकीत प्रत दर महिन्याला या कार्यालयास सादर करावी.

**प्रतिलिपी :-** उपविपोअ वणी/ठाणेदार, पो.स्टे. वणी/कर्म.आस्थापना लिपीक(कक्ष-०९)/कक्ष०९-०१/कर्म. वेतन लिपीक (कक्ष-१८)/भनिनि लिपीक(कक्ष-१५)/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वस्त्रभंडारपाल यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस.

**प्रत माहितीस :-** पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

1490
क्र: पोअय/कक्ष-१२/कसुरी/प्रा.चौ/अ.आ./सपोनि-पुंडगे/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 3 FEB 2025

## अंतिम आदेश

**कसुरदार :-** सपोनि/सुगत पुंडगे, तत्का. नेमणुक महामार्ग पोलीस केंद्र बडनेरा, जि. अमरावती - सध्या स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ.

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२/चौकशी/सपोनि-पुंडगे/कादानो/२०१४३/२०२४, दिनांक २४/०९/२०२४.

**थोडक्यात कसुरी :-** म.पो.केंद्राचे प्रभारी अधिकारी या नात्याने प्रशासकीय कामकाजावर लक्ष न ठेवता खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

**कसुरी :-**

सपोनि/सुगत पुंडगे, तुम्ही महामार्ग पोलीस केंद्र बडनेरा, जि. अमरावती येथे प्रभारी अधिकारी म्हणुन कार्यरत असतांना खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याचे निदर्शनास येत आहे.

१) प्रभारी अधिकारी या नात्याने तुम्ही आपले उपस्थितीत म. पो. केंद्रातील पोलीस अधिकारी अंमलदार यांची सर्वप्रथम म.पो.केंद्र येथे प्रशासकीय कामकाजाचे अनुषंगाने गिनती घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन सर्व अंमलदार यांचे कामकाजाचा आढावा घेता येईल व त्यांना कामकाजाबाबत सूचना देता येईल. परंतू तुमचे गैरहजेरीमध्ये कर्तव्यावरील पोलीस अंमलदार यांनी वाय.पॉईट येथे हजेरी घेणे हे म.पो. केंद्राचे कामकाजाच्या दृष्टीने योग्य नाही.

२) म.पो. केंद्रास भेटीअंती पोलीस अधीक्षक महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, नागपुर यांनी स्टेशन डायरीबाबत विचारणा केली असता स्टेशन डायरी अंमलदार पोहवा/१२३५ झुल्फीकार यांनी सांगितले की, स्टेशन डायरी ही म.पो. केंद्र येथे ठेवण्यात येत आहे. कर्तव्याचे ठिकाणी वाय. पाईट येथेच ठेवण्यात येत असून तेथेच गिनती घेतली जाते. स्टेशन डायरी हे पोलीस विभागातील महत्वाचा दस्ताऐवज हे नियंत्रण कक्ष येथे ठेवणे आवश्यक असतांना ते तिथे ठेवण्यात येत नसल्यामुळे तुमचे प्रशासकीय कामकाजाकडे लक्ष नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदरची बाब गंभीर असल्याचे दिसून आले.

३) प्रभारी अधिकरी या नात्याने तुम्ही कर्तव्यावर वेळेत उपस्थित राहत नसल्यामुळे तुमचेसह इतर पोलीस अधिकारी/अंमलदार हे आप-आपल्या सोईनुसार शासकीय दस्तऐवज घेवून जात असून सोईनुसार नोंदी घेत असल्याचे दिसते यावरुन प्रभारी अधिकारी यांचे अधिपत्याखालील अधिकारी/अमलदार यांचेवर नियंत्रण नसल्याचे दिसून येते.

४) म.पो. केंद्रातील कर्तव्यावरील पोलीस अंमलदार यांची सकाळी ०९.३० वाजता रिलीफ झाल्यानंतर विश्रांतीकरिता रवाना होणे आवश्यक असतांना रिलीफ येण्या अगोदर परपस्पर पोलीस अंमलदार हे घरी निघून जात असल्याचे

आढळून आले. यावरून तुमचे म.पो. केंद्राचे प्रशासकीय कामकाजाकडे लक्ष नाही व यातूनच अंमलदार यांचेमध्ये वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५) पोउपनि/राजू चौधरी यांनी बयानात नमुद केले आहे की, सपोनि/पुंडगे यांचेकडून फोनद्वारे बदली साप्ताहीक सुट्टी भोगण्याची परवानगी घेवून रवाना झालो. त्याबाबत पोलीस निरिक्षक अथवा पोलीस अधीक्षक कार्यालयास काहीही कळविण्यात आले नाही. वास्तविक पाहता बदली साप्ताहीक करिता या कार्यालयाकडून परवानगी घेवून साप्ताहीक उपभोगणे अपेक्षित असतांना तुम्ही परस्पर परवानगी देत असल्याने दिसून येते. तसेच परवानगी दिलेबाबत पोलीस निरीक्षक अथवा वरिष्ठांना काहीही कळविले नाही. यावरुन तुम्ही वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना करीत असल्याचे दिसून येते.

६) प्रादेशिक विभागातील सर्व पोलीस अधिकारी यांचे या कार्यालयाचे आदेशान्वये साप्ताहीक सुट्टीचे दिवस ठरवून *देण्यात आले आहे. परंतू पोउपनि/चौधरी यांनी कोणत्याही प्रकारे पूर्व परवानगी न घेता फक्त प्रभारी अधिकारी यांना* फोनद्वारे माहिती देवून परस्पर साप्ताहीक सुट्टी नसलेल्या दिनांकास रवाना झालेबाबत स्टेशन डायरीस नोंद घेण्यात आली आहे. वास्ताविक पाहता दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सुध्दा पोउपनि/चौधरी यांनी साप्ताहीक सुट्टी उपभोगल्याचे नियंत्रण कक्ष लोकेशन वरुन दिसून येते. यावरुन तुमचे तुमच्या अधिपत्याखालील पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेवर काहीही नियंत्रण दिसून येत नाही व तुम्ही स्वतःही उपस्थित न राहणे, उशिरा येणे, परस्पर निघून जाणे इत्यादी वर्तन करीत असून इतर अधिकारी यांना सुध्दा सोई नुसार परस्पर/स्वमर्जीने साप्ताहीक रजा उपभोगण्याची परवानगी काहीही विचार न करता देत आहेत. अशा तुमच्या वर्तनामुळे अधिकारी व अंमलदार यांचेमध्ये कुठलीही शिस्त अनुशासन राहणार नाही.

७) म.पो.केंद्र भेटी अंती डयुटी रजिस्टरवर पोना/२२३५ हे जावेद किरकोळ रजेवर असल्याचे दिसून आले परंतू पोना/जावेद यांचा किरकोळ रजेबाबतचा अर्ज तपासणी केला असता दिसून आला नाही यावरुन म.पो. केंद्राचा रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्यात येत नसल्याचे आढळून आले.

८) दिनांक ०५/०५/२०२२ रोजीच्या भेटी दरम्यान पोहवा/२००३, पोना/१८५५, पोना/१७११, पोशि/१७८२ हे पोलीस अंमलदार ११.०२ पर्यत कर्तव्यावर हजर झालेले नसल्याने दिसून आले त्यामुळे संबंधितांची गैरहजेरी घेण्यात येऊन तशा नोंदी घेण्यात आल्या. चौकशीमध्ये त्यांचे बयानाचे अवलोकन केले असता सर्वच पोलीस अंमलदार यांची तब्बेत बरी नसल्याचे नमुद करण्यात आले आहे. आम्ही दिनांक ०५/०५/२०२२ रोजी भेट दिल्यामुळे अंमलदार गैरहजर असल्याबाबत दिसून आल्यानंतर सर्वांनी तब्बेत बरी नसल्याचे कारण सांगितले यावरुन प्रभारी अधिकारी हे स्वतः म. पो केंद्र येथे उपस्थित न राहणे, परपस्पर निघून जाणे अशा वर्तनामुळे अंमलदार यांना देखील तसेच वर्तन करण्यास वाव मिळत आहे. अशामुळे म. पो. केंद्राचे कामकाज प्रभाविपणे कसे होईल याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

९) पोलीस अधीक्षक यांचे भेटी दरम्यान डयुटी रजिस्टर पडताळणी केली असता दिनांक २/५, ३/५, ४/५ व आज ५/५/५०२२ रोजी डयूटी रजिस्टरवर प्रभारी अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नसल्याने दिसून आले त्यामुळे प्रभारी अधिकारी हे म. पो. केंद्र येथे उपस्थित आहेत किंवा नाही याबाबत शंका निर्माण होते.

१०) सपोनि/पुंडगे तुमचे बयानप्रमाणे रविवार दिनांक ०१/०५/२०२२ रोजी महाराष्ट्र दिन असल्यामुळे दिवसभर म. पो. केंद्र येथे उपस्थित होतो व दिनांक ०२/०५/२०२२ रोजी बदली साप्ताहीक उपभोगली असल्याने नमुद केले आहे. परंतू नियंत्रण कक्ष, नागपूर येथे उपस्थितीची माहिती देताना दिनांक ०१/०५/२०२२ रोजी झेंडा वंदनाचा कार्यक्रमानंतर साप्ताहीक सुट्टीवर रवाना झाल्याबाबत माहिती दिली तसेच दिनांक ०२/०५/२०२२ रोजी सुध्दा बदली साप्ताहीक असल्याबाबत नियंत्रण कक्ष येथे माहिती दिली. यावरुन तुम्ही वरिष्ठ कार्यालयास खोटी व दिशाभूल करण्यात येणारी माहिती देत असल्याने दिसून येते. यावरुन तुम्ही परस्पर साप्ताहीक रजा उपभोगत असल्याचे दिसून येते. प्रभारी अधिकारी नात्याने तुमचे वर्तन बेजबाबदारपणाचे दिसून येते.

११) सपोनि/पुंडगे तुम्ही दिनांक ०५/०५/२०२२ रोजी भेटी अंती गैरहजर असल्याने दिसून आल्यानंतर पोलीस निरीक्षक यांना तब्बेत बरी नसल्याबाबत कळविले असल्याबाबत नमूद केले आहे. परंतू तुम्ही तुमचे तब्बेती बाबत पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक यांना काहीही कळविले नाही. भेटी अंती गैरहजर असल्याचे दिसून आल्यानंतर तुमचेकडुन गैरहजेरीच्या कारणाबाबत सारवा सारव करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे दिसून येते

१२) म.पो.केंद्र बडनेरा प्रभारी अधिकारी या नात्याने तुम्ही दिनाक ०१/०१/२०२२ ते ०५/०५/२०२२ रोजीपर्यत किती वेळा म. पो. केंद्रात गिनती घेतली याबाबतचा आढावा घेतला असता चार महिने पाच दिवसात फक्त २० दिवस गिनती घेतल्याबाबत नमूद आहे हे प्रमाण अल्प आहे. उर्वरीत सर्व नोंदी व गिनती हया दुय्यम अधिकारी यांनी घेतल्याचे दिसून येते. यावरून तुम्ही गैरहजर राहणे, परस्पर निघून जाणे ही सवय पाहता तुमचे उपस्थितीबाबत साशंकता आहे.

१३) यापूर्वीही पोलीस अधीक्षक यांनी दिनांक १६/१०/२०२० रोजी म. पो. केंद्र, बडनेरा येथे भेट दिली असता म. पो. केंद्र बडनेरा येथे फक्त १ अंमलदार उपस्थित असल्याचे आढळून आले. दरम्यानचे कालावधी म. पो. केंद्राचे समोर खाजगी व्यक्ती दारू पिऊन शिवीगाळ करित आढळून आले. त्यामुळे म. पो. केंद्र येथे कमीत-कमी ५ अंमलदार कर्तव्यार्थ ठेवणेबाबत या कार्यालयाचे आदेश क्र. पो. अ/मपोप्राविना/पुंडगे/२०२०/२३७१, दिनांक ०६/११/२०२० अन्वये सुचित करण्यात आले होते. परंतू म. पो. केंद्र येथे एकच पोलीस अंमलदार ठेवण्यात येत असल्याचे आढळून आले त्यामूळे तुमचेकडुन प्रशासकीय कामकाज गांभीर्यपूर्वक करीत नसल्याचे तसेच वरिष्ठाचे आदेशाचे पालन करीत नसल्याचे दिसून येते.

१४)दिनांक ०५/०५/२०२२ रोजीच्या भेटी दरम्यान पोहवा/२००३, पोना/१७११, पोशि/१७८२ हे पोलीस अंमलदार ११.०२ पर्यंत कर्तव्यावर हजर झालेले नसल्याने दिसून आले.

उपरोक्त बाबीवरुन सपोनि/सुगत पुंडगे तुम्ही वरिष्ठ अधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता परस्पर साप्ताहीक सुट्टी दोनदा उपभोगतात, कर्तव्यावर गैरहजर राहतात, शासकीय दस्तऐवजामध्ये खोटया नोंदी घेवून नियत्रंण कक्षास सुध्दा खोटी माहिती देत असल्याचे दिसून येते. तुमचे कर्तव्यावर गैरहजर राहण्याच्या सवयीचे दुष्परिणाम इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर होत असल्याचे आढळून आले आहे. प्रभारी अधिकारी हेच कर्तव्याचे ठिकाणी गैरहजर राहत असल्यामुळे शासकीय कामकाजावर वाईट परिणाम होत असून महत्वाचे दस्ताऐवज स्टेशन डायरी म.पो. केंद्र येथे न ठेवता महामार्गावर अंमलदार यांचे कर्तव्याचे ठिकाणी घेवून जावून येथे हजेरी घेण्यात येते ही बाब अत्यंत बेशिस्तपणाचे व बेजबाबदारपणाची आहे. बडनेरा म.पो. केन्द्राचे प्रभारी अधिकारी या नात्याने तुमचे प्रशासकीय कामकाजावर यांचे लक्ष नसल्यामुळे इतर पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे कामकाजावर विपरित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, नागपुर यांचे आदेश क्र. पोअ/मसुवि/विनापरवानगी गैर.पुंडगे/४१५/२०२२, दिनांक २२/०३/२०२२ अन्वये पोलीस निरीक्षक, महामार्ग सुरक्षा विभाग, अमरावती यांचेकडे चौकशी आदेशीत करण्यात आली. त्यानुसार पोलीस निरीक्षक, महामार्ग सुरक्षा विभाग, अमरावती यांचे अहवाल क्र. ०७/२०२२, दिनांक १३/०५/२०२२ अन्वयें चौकशी करुन अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार, शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात प्रभारी अधिकारी म्हणुन कर्तव्य पार पाडीत असतांना नेमुन दिलेल्या कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन तुम्ही उपरोक्त नमुद कर्तव्यामध्ये बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे व प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्मान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२/चौकशी/सपोनि-पुंडगे/कादानो/२०१४३/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात

आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक २५/१२/२०२४ रोजी स्विकारली व दिनांक ०६/०१/२०२५ रोजी स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक २३/०१/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता तुम्ही सादर केलेला लेखी व मौखीक खुलासा हा अशंतः समाधानकारक असल्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कमी करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**सपोनि/ सुगत पुंडगे, तत्का. नेमणुक महामार्ग पोलीस केद्र बडनेरा, जि. अमरावती सध्या स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (चार) मधील तरतुदीनुसार "रुपये ५०००/- आर्थीक दंड" ही शिक्षा देण्यात येत आहे.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे **६०** दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**सपोनि/सुगत पुंडगे,**
नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ.

**मार्फत :- पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :- पोउपअधि(मुख्या) यवतमाळ/प्रभारी अधिकारी स्था.गु.शा. यवतमाळ/कक्ष-१०/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१७)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-१०** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अधिकारी यांचे सेवापुस्तकात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाँकीत प्रत या शाखेस सादर करावी.

**प्रत माहितीस :- पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, नागपुर.**

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.: पोअय/कक्ष 12(1)/अपिल आदेश/ तामिल पत्र/ 1568 /25
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 3 FEB 2025

**संदर्भ :-** विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे कडील अपिल आदेश क्र अप./कक्ष- ५/यवतमाळ/अपिल आदेश/मपोशि-१५१८ चौबे+३/२७२६/२०२४, दि. १९/१२/२०२४

**विषय :-** **अपील आदेश तामिल बाबत.**
**१) मपोशि /१५१८पुनम चौबे,**
**२) मपोना /१०६२ सरीता अदापुरे,**
**३) मपोना /२३९६ वनिता खेडकर**
**सर्व नेमणुक पोलीस स्टेशन, लोहारा**

-----०००-----

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, **१) मपोशि /१५१८पुनम चौबे, २) मपोना /१०६२ सरीता अदापुरे, ३) मपोना /२३९६ वनिता खेडकर सर्व नेमणुक पोलीस स्टेशन, लोहारा** यांना **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे "** या शिक्षेविरुध्द अपिल अर्ज मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना या कार्यालयाचे मार्फतीने सादर केल्याप्रकरणी त्यांचेकडुन वरील संदर्भान्वये अपिल आदेश या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदर प्रकरणी **१) मपोशि /१५१८पुनम चौबे, २) मपोना /१०६२ सरीता अदापुरे, ३) मपोना /२३९६ वनिता खेडकर सर्व नेमणुक पोलीस स्टेशन, लोहारा** यांना अपिल अर्जान्वये **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे "** या शिक्षेत बदल करुन **"रु.२०००/-आर्थिक दंड "** ही शिक्षा दिली आहे. तरी अपील आदेशाची मुळ प्रत संबंधितास त्वरीत अदा करुन अपील आदेशाच्या दुय्यम प्रतीवर त्यांची नावानिशी दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत नावानिशी स्वाक्षरीसह ०७ दिवसाचे आत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

**सहपत्र :-** अपील आदेश

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**१) मपोशि /१५१८ पुनम चौबे, २) मपोना /१०६२ सरीता अदापुरे, ३) मपोना /२३९६ वनिता खेडकर**
**सर्व नेमणुक पोलीस स्टेशन, लोहारा**

**मार्फत - प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, लोहारा (व्दिप्रतीत)**

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन **अपील आदेशाच्या दुय्यम प्रतीवर नावानिशी त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत** या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत - प्रमुख लिपीक आस्थापना शाखा, लेखा शाखा /कक्ष १४/कक्ष ९ (३) (४) (५)/ कक्ष १८/ ठाणेदार पोलीस स्टेशन, लोहारा यांना माहीतीस व उचित कार्यवाहीस.

कळ ५८.


# कार्यालय : विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती -४४४ ६०६ ( महाराष्ट्र )

दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/

www.igpamravatirange.gov.in


क्रमांक :- अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/मपोशि-१५१८ चौबे +३/२०२४ /2726 अमरावती, दि... 19 DEC 2024

वाचा:- १) मपोशि/१५१८, पुनम चौबे इतर ३ नेम.पोस्टे., लोहारा नेम. जि.यवतमाळ यांच्या विरुध्द संक्षिप्त चौकशीचे कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ.मपोशि १५१८+३/१९३०/२०२४, दिनांक १६/०२/२०२४

३) मपोशि/१५१८, पुनम चौबे, मपोशि/१०६३, सरीता अदापुरे, मपोना/२३९६, वनिता खेडकर यांचा दि.०३.०४.२०२४ रोजीचा अपील अर्ज

## -: अपील आदेश :-

अपिलार्थी १) मपोशि/१५१८, पुनम चौबे, २) मपोशि/१०६३, सरीता अदापुरे, ३) मपोना/२३९६, वनिता खेडकर नेम. पोस्टे., लोहारा नेम. जि.यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरीबद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी संक्षिप्त चौकशी करुन संदर्भ क्रमांक ०२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " ही शिक्षा दिलेली आहे.

**कसुरी :-**

तुम्ही १) मपोशि /१५१८पुनम चौबे २) मपोशि /१०८० सपना लढे ३) मपोना १०६२ सरीता अदापुरे ४) मपोना २३९६ बनिता खेडकर पोलीस स्टेशन, लोहारा येथे कार्यरत असून मा. पोलीस अधिक्षक साहेब यवतमाळ यांचे आदेशान्वये तुम्हाला वार्डन सेक्टर ड्युटी करीता खंडाळा येथे जाण्याकरिता आदेश दिला असता तुम्ही सदर कर्तव्यावर हजर न होता वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केली आहे.

पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे आदेश क्र.पोअय/प्रली/कक्ष-१/पोशि भरती-२०२१/वार्डन व सेक्टर ड्यूटी/१५६३०/२३, दि. ०५/१२/२०२३ अन्वये तुम्हाला १) मपोशि/१५१८ पुनम चौबे २) मपोशि/१०८० सपना लढे नेमणूक पोलीस स्टेशन, लोहारा वार्डन सेक्टर डयुटी करीता पी.टी.एस. खंडाळा येथे डयुटीपास देवून दि.०६/१२/२०२३ रोजी रवाना केले. परंतु तुम्ही पो.टी.एस. खंडाळा येथे कर्तव्यावर हजर न झाल्याबाबत तेथुन फोनव्दारे माहिती मिळाल्यावरुन नविन महिला पोलीस अंमलदार ३) मपोना/१०६२, सरीता अदापुरे ४) मपोना/२३९६, वनिता खेडकर तुम्हाला ड्यूटीपास देवुन दिनांक ०८/१२/२०२३ रोजी पी.टी.एस. खंडाळा येथे रवाना केले. परंतु तुम्हीसुध्दा कर्तव्यावर हजर झाल्या नाही. पोलीस स्टेशन, लोहारा येथील दोन महिला अंमलदार पाठविण्याबाबत आदेशीत केल्याने शेवटी मसफौ/१५७६, मेघा ढवळे व मपोहवा/४४६, अनिता बोरकर यांना दि.०९/१२/२०२३ रोजी डयुटी पास देवून पी. टी. एस खंडाळा येथे रवाना झाल्या.

अशाप्रकारे तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाची अवहेलना केली आहे तसेच कर्तव्यात हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा केला आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही वर नमुद प्रमाणे कसुरी केली आहे. तुमच्या या प्रवृत्तांचा विपरीत परिणाम इतर पोलीस अंमलदारावर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त कसुरी करीता पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी १) मपोशि/१५१८, पुनम चौबे, २) मपोशि/१०६३, सरीता अदापुरे, ३) मपोना/२३९६, वनिता खेडकर नेम. पोस्टे., लोहारा नेम. जि.यवतमाळ यांचेविरुध्द संक्षिप्त चौकशी करुन चौकशीअंती त्यांना कसुरी सिध्द झाल्याने " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " हि शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुद अपिलार्थी यांनी या कार्यालयास उद्देशुन संदर्भ क्र.३ प्रमाणे अपील अर्ज केला आहे अपीलार्थी यांनी केलेला अपिल अर्ज मुदतीत असुन तो विचारात घेण्यात आला आहे.

अपिलार्थी १) मपोशि/१५१८, पुनम चौबे, २) मपोशि/१०६३, सरीता अदापुरे, ३) मपोना/२३९६, वनिता खेडकर नेम. पोस्टे., लोहारा नेम. जि.यवतमाळ यांचेविरुध्दच्या संक्षिप्त चौकशीचे कागदपत्र, त्यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेले मुददे व त्यावर पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी सादर केलेले निराकरण टिपणीचे अवलोकन केले तसेच अपील आदेश निर्गमित करण्यापुर्वी अपिलार्थी यांना त्यांची बाजु माडण्या करिता दिनांक १७.१२.२०२४ रोजी समक्ष सुनावणीची संधी देण्यात आली असुन अपीलार्थी यांनी आज्ञांकित कक्षात उपस्थित केलेले मुद्दे आम्हास संयुक्तीक व समाधानकारक वाटत असुन अपिलार्थी यांना पोलीस अधीक्षक यांनी दिलेली शिक्षा हि कसुरीच्या तुलनेत जास्त वाटत असल्याने **मी रामनाथ ल. पोकळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती** खालील प्रमाणे अपिल आदेश देत आहे.

## -: आदेश :-

**१) मपोशि/१५१८, पुनम चौबे, २) मपोशि/१०६३, सरीता अदापुरे, ३) मपोना/२३९६, वनिता खेडकर नेम. पोस्टे., लोहारा नेम. जि.यवतमाळ** यांना पोलीस अधीक्षक, यांनी आदेश क्र.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ/मपोशि-१५१८+३/ १९३०/ २०२४, दिनांक १६/०२/२०२४ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " या शिक्षेत बदल करुन " **रु. २०००/- आर्थीक दंड** " ही शिक्षा देण्यात येत आहे.

अपीलार्थी यांची इच्छा असल्यास ते सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन (६०) दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे योग्य मार्फतीने फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

19/12/2024

**( रामनाथ ल. पोकळे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

**प्रति,**

१) मपोशि/१५१८, पुनम चौबे, २) मपोशि/१०६३, सरीता अदापुरे, ३) मपोना/२३९६, वनिता खेडकर सर्व नेम. पोस्टे., लोहारा नेम. जि.यवतमाळ

**प्रत व मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत अपीलार्थी यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत याकार्यालयास सादर करावी.

1569

क्र.पोअय/कक्ष १२(१)/कसुरी-बदली/पोशि १३४१ हटकर/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 3 FEB 2025

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## कार्यालयीन आदेश

**संदर्भ :-** अ) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांचे पत्र क्र.
१) क्र. पोमुय/रजा गैरहजर पो.अंम./हजर/२०३/२०२४, दि.२२/०१/२०२४
२) क्र. पोमुय/पोशि १३४१ विजय हटकर/किरकोळ रजा गैर./२०३/२०२४, दि.२२/०१/२०२४

**विषय :-** **कसुरीच्या कारणास्तव बदली करण्याबाबत.**

---ooo---

यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील खालील नमूद पोलीस अंमलदार हे पोलीस मुख्यालय येथे कार्यरत असतांना सन २०११ पासून ते आजपावेतो ७७८ दिवस सिक/गैरहजर राहीले आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे आदेश दि. ०४/०४/२०२४ अन्वये दि. ११/०५/२०२३ ते दि. २४/०१/२०२४ = २५८ दिवस विनावेतन व दि. २५/०१/२०२४ ते दि. २८/०३/२०२४ = ६४ दिवस अर्जित रजा मंजूर करण्यात आली आहे. सदर अंमलदार सतत गैरहजर व सीक रजेवर जाण्याची सवय असून त्यांनी आपल्या कर्तव्याप्रती बेजबादारपणा केल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे. करिता त्यांनी त्यांचे कर्तव्यात केलेल्या कसुरी प्रकरणी प्राथमिक चौकशीअंती त्यांना त्यांचे मूळ नेमणुकीच्या ठिकाणावरुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्वरीत प्रभावाने कसुरीच्या कारणास्तव बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व पदनाम | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|
| ०१. | **पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर** | पोलीस मुख्यालय, यवतमाळ | पोलीस स्टेशन, दराटी |

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**
**पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर,**
**नेम. पोलीस मुख्या. यवतमाळ**

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ.**
२/- नमूद पोलीस अंमलदार यांना तात्काळ बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल त्वरित या कार्यालयास सादर करावा.

**प्रत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, दराटी**
३/- नमूद पोलीस अंमलदार हे पोलीस स्टेशन दराटी येथे हजर झाल्याची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

**प्रत :-** राखीव पोलीस निरीक्षक, पो. मुख्या. यवतमाळ//प्रमुख लिपीक, कर्म.आस्थापना /कक्ष-९/कक्ष -९(३)/कक्ष-१८/ कक्ष-१४/नोंदणी लिपीक पो.अ.कार्या. यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस

1570

क्र.:पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./पोशि 1341 हटकर / /24
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक 3 FEB 2025

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

3 FEB 2025

**अंतिम आदेश**

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि १३४१ हटकर/२०५६३/२०२४, दि.०३/१०/२०२४

**कसुरदाराचे नाव :- पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर, नेम. पोलीस मुख्या. यवतमाळ**

---ooo---

तुम्ही पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर, नेम. पोलीस मुख्या. यवतमाळ यांचे गैरहजर राहत असल्याने गैरहजर कसुरी अहवालाच्या अनुषंगाने एकुण ३२२ दिवस किरकोळ रजा गैरहजर प्रकरणी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष-९(३)/पोशि १३४१ हटकर/ ४६०१/ २०२४, दि. ०२/०४/२०२४ अन्वये पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर, तुमचे गैरहजर कालावधीचे प्रकरण कक्ष-९(३) यांनी प्राथमिक चौकशी करण्यासाठी या शाखेस हस्तांतरीत केले आहे. तुम्ही पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर तुम्हाला या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष-९(२)/सिक/४६१३,२०२४, दि. ०४/०४/२०२४ अन्वये दिनांक ११/०५/२०२३ पासुन ते दि.२८/०३/२०२४ पर्यतचा एकुण ३२२ दिवस किरकोळ रजा गैरहजर कसुरी प्रकरणी तुम्हाला वसंतराव नाईक शासकिय कॉलेज यवतमाळ येथे वैद्यकिय मंडळापुढे हजर करण्यात आले. वैद्यकिय अधिष्ठाता, वसंतराव नाईक शासकिय कॉलेज यवतमाळ यांचे पत्र क्र. VNGMCY/MB/१२९९/२०२४, दि. १९/०३/२०२४ अन्वये वैद्यकिय मंडळाकडील प्राप्त अहवालानुसार तुम्हाला दि.२८/०३/२०२४ रोजी मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे समक्ष हजर करुन घेण्यात आले. तुमचा गैरहजर कालावधी हा खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आली आहे.

पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर तुम्ही पोलीस मुख्या. यवतमाळ येथे नेमणुकीस असून तुमच्या सेवापटाची पडताळणी केली असता सन २०११ पासून ते आजपावेतो त्यांचा रजा कालावधी ७७८ दिवस सिक/गैरहजर राहीले आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष-९(२)/सिक/४६१३/२०२४, दि. ०४/०४/२०२४ अन्वये दिनांक ११/०५/२०२३ पासुन ते दि.२८/०३/२०२४ पर्यतचा एकुण ३२२ दिवस किरकोळ रजा गैरहजर होते. दि. ११/०५/२०२३ ते दि. २४/०१/२०२४ = २५८ दिवस विनावेतन रजा व दि. २५/०१/२०२४ ते दि. २८/०३/२०२४ = ६४ दिवस अर्जित रजा मंजूर करण्यात आली आहे. तुम्हाला नेहमीच गैरहजर व सीक रजेवर जाण्याची सवय असून तुम्हाला आपल्या कर्तव्याप्रती कमालीची उदासिनता असल्याचे तुमच्या वर्तवणुकीतून दिसून येत आहे.

तुम्हाला वारंवार गैरहजर राहण्याची सवय असल्याचे दिसून येत आहे. तुमच्या या बेपर्वा, बेशिस्त, बेजबाबदार वर्तणुकीसाठी तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन, तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व गंभिर स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास येत आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यांवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुम्ही कर्तव्यात बेजबाबदारपणा निष्काळजीपणा केला असून कर्तव्याप्रती तुमची कमालीची उदासिनता असल्याचे दिसुन येते. तुमच्या या गैरहजर राहण्याच्या प्रवृतीचा विपरीत परिणाम इतर पोलीस अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष १२-१/प्रा.चौ./पोशि १३४१ हटकर/७५९८/२०२४, दि.१३/०६/२०२४ अन्वये प्राथमिक चौकशी प्रस्तावित करण्यात आली असुन सदर प्राथमिक चौकशी प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, लोहारा यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन त्यांनी दिनांक ०९/०९/२०२४ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन तुम्ही सन २०११ ते सन २०२४ पर्यत एकुण वैद्यकिय आणि गैरहजर कालावधी ४५६ दिवस पर्यत ते वारंवार गैरहजर असल्याचे सवयीचे असल्याबाबत त्यांच्या रिपोर्ट वरुन दिसून येत आहे. यावरुन त्यांचा कामाप्रती बेजबाबदारपणा असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे त्याबाबत त्यांचा कसुरी अहवाल सादर

करुन ते गैरहजर असल्याने दि.११/०५/२०२३ ते २८/०३/२०२३ पर्यत ते एकुण ३२२ दिवस कालावधीत गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. सदर पोलीस अंमलदार हे मा. पोलीस अधीक्षक यांचे आज्ञांकित कक्षात हजर झाले. त्यानुसार या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष ९(३)/सिक/४५२१/२०२४, दि. २८/०३/२०२४ अन्वये कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहेत. पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर हे पोलीस मुख्या. यवतमाळ याची २५७ दिवस रजा विनावेतन करण्यात आलेले आहेत. तसेच ६४ दिवस अर्जित रजा मंजूर करण्यात आलेली आहे.

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात गैरहजर राहुन गैरवर्तन केले आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि १३४१ हटकर/२०५६३/२०२४, दि.०३/१०/२०२४ नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ तीन (०३) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?"** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस दि. ०७/१०/२०२४ रोजी स्विकारली असून तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. त्यानंतर तुम्हाला कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करण्याबाबत २,व ३ असे स्मरणपत्राव्दारे कळविण्यात आले. तरीसुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष १२(१)/आज्ञांकित कक्ष/पो. अंमलदार/१३८७/२०२५, दि.२९/०१/२०२५ रोजी पत्राव्दारे दि. ३१/०१/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. तुम्ही आज्ञांकित कक्षात सकाळी ०९.३० वा हजर राहणे आवश्यक असतांना तुम्ही स्वतःच्या मनाने उशिरा १२.१५ वा. हजर झाले. तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता यावे म्हणुन तुम्हाला आमचे समक्ष बोलावण्यात आले. तेव्हा तुम्हाला गैरहजर राहण्याचे संयुक्तीक कारण सांगता आले नाही. तसेच तुम्ही केलेल्या कथनात सत्यता दिसून आली नाही. तसेच तुम्हाला वरिष्ठांनी दिलेल्या वेळेचे महत्व दिसून आले नाही. तुम्ही आमचे समक्ष आज्ञांकित कक्षामध्ये सादर केलेले मौखिक व लेखी स्पष्टीकरण असमाधानकारक दिसून आले आहे. तसेच प्राथमिक चौकशीमध्ये कसुरदार यांना गैरहजर राहण्याची सवय असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर, नेम. पोलीस मुख्या. यवतमाळ** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(५) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ तीन (०३) वर्षाकरीता रोखणे (अपरिणामकारक) "** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा सोडुन गणण्यात येईल.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**पोशि/१३४१ विजय चंपतराव हटकर, नेम. पोलीस मुख्या. यवतमाळ**

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक आस्थापना, कक्ष ९ (३)/कक्ष १४/कक्ष-१८/नोंदणी लिपीक, पो.अ.यवतमाळ/राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना लिपीक (कक्ष ९(३) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

1629
क्र: पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/अ.आ/मपोशि-१४७८ जुमनाके/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- - 4 FEB 2025

**अंतिम आदेश**

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/कादानो/मपोशि-१४७८ जुमनाके/२२३२२/२०२५, दिनांक २०/१२/२०२४.

**कसुरदाराचे नाव** :- मपोशि/१४७८ पुजा चद्रभान जुमनाके, तत्का. नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर सध्या पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**थोडक्यात कसुरी** :- मृतक अरविंद किन्नाके यास आत्महत्या करणेकरीता प्रवृत्त करुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

कसुरदार मपोशि/१४७८ पुजा चंद्रभान जुमनाके, तुम्ही पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे नेमणुकीस असतांना तुमचे मृतक नामे अरविंद किनाके, रा. बोरगाव लिंगा, ता. नेर, जि. यवतमाळ ह.मु. यवतमाळ यांचेशी प्रेमसंबध होते. परंतु तुम्ही मृतक अरविंद किनाके, याचेशी लग्न करण्यास नकार दिल्याचे कारणावरुन दिनांक ०६/०२/२०२३ रोजी वाद झाला व त्याच दिवशी मृतक अरविंद किनाके यांनी विषारी औषध घेतल्याने त्याला शासकीय रुग्णालय यवतमाळ येथे भरती कली असता दिनांक १३/०२/२०२३ रोजी उपचारा दरम्यान मृत्यु झाला. तक्रारदार रविद्र श्रावण किनाके, रा. बोरगाव लिंबा, ता. नेर, जि. यवतमाळ यांनी त्यांचे भाऊ मृतक अरविंद किनाके, याला आर्थीक व मानसिक त्रास देवुन आत्महत्या करण्यास प्रोत्साहन दिल्याप्रकरणी तुमचे विरुध्द पो.स्टे. अवधुतवाडी येथे अप.क्र. ३७/२०२४ कलम ३०६, २०१, ५०४ सहकलम ६५ माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये दिनांक २५/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कसुरदार मपोशि/१४७८ पुजा चंद्रभान जुमनाके, तत्का. नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर सध्या पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही शिस्तप्रिय पोलीस विभागात महत्वाचे पदावर कर्तव्यावर आहात. तुम्हाला कायदयाचे ज्ञान अवगत असुन तुम्ही मृतक अरविंद किनाके, यांना आत्महत्येपासुन परावृत्त करणे अपेक्षीत असतांना सुध्दा तुम्ही त्यांना आत्महत्येपासुन परावृत्त करणेबाबत कोणतेही उपाय केला नाही त्यामुळे मृतक यांचा मृत्यु झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तुमच्या अश्या वर्तणामुळे पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन होण्यास तुम्ही कारणीभुत ठरले आहात. तुमची पोलीस विभागामध्ये दिर्घकाळ सेवा असतांना सुध्दा तुम्ही तुमचे कर्तव्यामध्ये गंभीर गैरकृत्य केल्याचे निदर्शनास येत आहे. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/मपोशि-१४७८ पुजा जुमनाके/१११७३ /२०२४, दिनांक २७/०८/२०२४ अन्वये प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात आली असुन सदर प्रकरणी प्राथमिक चौकशीकरीता पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ यांनी दिनांक

१४/११/२०२४ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केला. सदर चौकशी अहवालानुसार तुम्ही तुमचे कर्तव्यात कसुरी केल्याचे निष्पन्न होत असल्याने तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/कादानो/मपोशि-१४७८ जुमनाके/२२३२२/२०२५, दिनांक २०/१२/२०२४ अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक २४/१२/२०२४ रोजी स्विकारली. त्यानुसार दिनांक २४/०१/२०२५ रोजी स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता तुम्ही सादर केलेला लेखी खुलाश्यामध्ये तुम्ही तुमच्यावर ठेवण्यात आलेल्या कोणत्याही दोषारोपाचे खंडण केले नाही तसेच मौखीक खुलाश्यामध्ये सुध्दा तुम्ही तुमची बाजु मांडली नाही यावरुन तुमचे विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे तुम्हाला मान्य असल्याने तसेच तुमचे विरुध्द करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये तुम्ही अशोभनिय कृत्य केल्याचे सिध्द झाले आहे. तरी तुमच्या आर्थीक परिस्थीतीचा विचार करुन प्रस्तावीत करण्यात आलेली शिक्षा अशंतः कमी करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**कसुरदार मपोशि/१४७८ पुजा चंद्रभान जुमनाके, तत्का. नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर सध्या पोलीस मुख्यालय यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (०२) वर्ष रोखणे (अपरिणामकारक)" शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे <u>६०</u> दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**<u>मपोशि/१४७८ पुजा जुमनाके,</u>**
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :- पोउपअधि(मुख्या) यवतमाळ/प्रभारी अधिकारी पो.स्टे. यवतमाळ/पो.स्टे.अवुधतवाडी/रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ/कक्ष-९/कक्ष-०९-०३/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१८)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-०९-३** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र: पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/अ.आ/पोहवा-१२९३ पेंढारकर/ 1630 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 4 FEB 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/कादानो/पोहवा-१२९३ पेंढारकर/२२५६९/२०२५, दिनांक ३०/१२/२०२४.

**कसुरदाराचे नाव** :- पोहवा/१२९३ निलेश पेंढारकर तत्का. नेमणुक पो.स्टे. महागाव सध्या पो.मुख्या. यवतमाळ.

**थोडक्यात कसुरी** :- मुख्यालयाचे ठिकाणी गैरहजर राहुन अर्जदार यांना अश्लील मॅसेजेस करुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

कसुरदार पोहवा/१२९३ निलेश सुरेश पेंढारकर, तुम्ही पोलीस स्टेशन महागाव येथे नेमणुकीस असतांना तुमच्याकडे स्टेशन डायरी अंमलदार म्हणुन कामकाज देण्यात आले. दिनांक २०/०६/२०२४ रोजी तुमची स्टेशन डायरी अंमलदार म्हणुन डयुटी लावण्यात आली असुन तुम्ही वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता वरिष्ठांचे परवानगी शिवाय तुम्ही मुख्यालयाचे ठिकाण सोडुन पुसद येथे गेले व त्याबाबत स्टेशन डायरीमध्ये नोंद घेतलेली नाही.

कसुरदार पोहवा/१२९३ निलेश सुरेश पेंढारकर, तत्का. नेमणुक पो.स्टे. महागाव सध्या पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही तुमचे मोबईल क्र. ९०११८०९८८८ वरुन अर्जदार श्रीमती वर्षा देवानंद बुरकुले, रा. वसंतनगर, ता. पुसद, जि. यवतमाळ यांना त्यांचे मोबाईल क्रमांक ८७८८५७७२६३ यावर अश्लील व गलीच्छ फोटो व मॅसेजेस व्हॉटस अपव्दारे पाठविले. अर्जदार यांनी तुम्हाला अश्लील फोटो पाठविण्यापासुन मज्जाव केला असता, तुम्ही दिनांक २०/०६/२०२४ रोजी अर्जदार यांचे पती देवानंद बुरकुले यांना मारहाण केली. तसेच रुपये २,००,०००/- खंडणीची मागणी करुन अर्जदार यांना व त्यांचे पती, मुलाला खोटया फौजदारी प्रकरणात अडकविण्याची धमकी दिल्याने तुमचे विरुध्द पो.स्टे. वसंतनगर येथे अप.क्र. ३३७/२०२४ कलम ३५४(ड), ३८४, ३२३, २९४, १४१, १४३, ५०६ भादवि सहकलम ३(१)(r)(s), ३(२)(v-a), ३(१)(w)(i)(ii), अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ अन्वये दिनांक ०६/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे.

कसुरदार पोहवा/१२९३ निलेश सुरेश पेंढारकर, नेमणुक पो.स्टे. महागाव तुम्ही पोलीस विभागामध्ये पोलीस हवालदार या महत्वाचे पदावर कार्यरत असुन तुमची पोलीस विभागामध्ये दिर्घकाळ सेवा झाली असतांना सुध्दा अर्जदार श्रीमती वर्षा देवानंद बुरकुले, रा. वसंतनगर, ता. पुसद, जि. यवतमाळ यांचे विषयी कोणत्याही प्रकारचा आदर व सन्मान न बाळगता त्यांचे मोबाईल क्रमांक ८७८८५७७२६३ यावर अश्लील व गलीच्छ फोटो व मॅसेजेस व्हॉटस अपव्दारे पाठवुन त्यांचे सोबत लज्जास्पद गैरर्वतन करुन मानसिक त्रास देवून दुष्कृत्य केले आहे. तुमच्या अशा गैरकृत्यामुळे शिस्तप्रिय अशा पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन होवुन सर्वसामान्य जनतेमध्ये विषेशत: महिलामध्ये पोलीसांविषयी नकारात्मक व अविश्वासाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/पोहवा-१२९३ पेंढारकर/११६४८/ २०२४, दिनांक ११/०९/२०२४ अन्वये प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात आली असुन सदर प्रकरणी प्राथमिक चौकशीकरीता प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पुसद शहर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पुसद शहर यांनी दिनांक १२/१२/२०२४ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केला. सदर चौकशी अहवालानुसार तुम्ही तुमचे कर्तव्यात कसुरी केल्याचे निष्पन्न होत असल्याने

तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/कादानो/पोहवा-१२९३ पेंढारकर/२२५६९/२०२५, दिनांक ३०/१२/२०२४ अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? तसेच दिनांक ०५/०७/२०२४ ते १७/११/२०२४ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) का गणण्यात येवु नये?" या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०८/०१/२०२५ रोजी स्विकारली. त्यानुसार दिनांक २३/०१/२०२५ रोजी स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता तुम्ही सादर केलेला लेखी खुलाश्यामध्ये तुम्ही तुमच्यावर ठेवण्यात आलेल्या कोणत्याही दोषारोपाचे खंडण केले नाही तसेच मौखीक खुलाश्यामध्ये सुध्दा तुम्ही तुमची बाजु मांडली नाही यावरुन तुमचे विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे तुम्हाला मान्य असल्याने तसेच तुमचे विरुध्द करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये तुम्ही अशोभनिय कृत्य केल्याचे सिध्द झाले आहे. तरी तुमच्या आर्थीक परिस्थीतीचा विचार करुन प्रस्तावीत करण्यात आलेली शिक्षा अशंतः कमी करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**कसुरदार पोहवा/१२९३ निलेश सुरेश पेंढारकर, तत्का. नेमणुक पो.स्टे. महागाव सध्या पो.मुख्या. यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे (अपरिणामकारक)" शिक्षा देण्यात येत आहे. तसेच दिनांक ०५/०७/२०२४ ते १७/११/२०२४ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) म्हणुन गणण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोहवा/१२९३ निलेश पेंढारकर,**
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :- उपविपोअ उमरखेड/प्रभारी अधिकारी पो.स्टे. पुसद शहर/पो.स्टे.महागाव/रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ/कक्ष-९/कक्ष-०९-०३/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१८)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-०९-३** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र:पोअय/कक्ष-१०/पो.अधि.सेवानिवृत्ती-२०२५/ 1732 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 5 FEB 2025

**आदेश**

**विषय :-पोलीस अधिकारी यांची नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती-सन-२०२५.**

****

उपरोक्त विषयान्वये, यवतमाळ जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस अधिकारी हे **कॅलेंडर वर्ष-२०२५** (दिनांक ०१/०१/२०२५ ते ३१/१२/२०२५) मध्ये वयाची ५८ वर्ष पूर्ण करीत असल्याने त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास मध्यानोत्तर पासून नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होतील.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे पूर्ण नांव व सध्याचे नेमणूकीचे ठिकाण | सेवापुस्तकातील नोंदीनुसार जन्मतारीख | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीची तारीख |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | श्री. वसंत महादेवराव शिंदे, पोलीस उप निरीक्षक पोस्टे. यवतमाळ ग्रामिण | २३/०३/१९६७ | ३१/०३/२०२५ |
| २. | श्री. भाष्कर देविदास दरणे, पोलीस उप निरीक्षक, पोस्टे. उमरखेड | ०५/०६/१९६७ | ३०/०६/२०२५ |
| ३. | श्री. अरुण रामरावजी नाकतोडे, पोलीस उप निरीक्षक, वाचक फौजदार, उपविपोअ/वणी | १२/०६/१९६७ | ३०/०६/२०२५ |
| ४. | श्री. मोहम्मद नाझीम शेख, पोलीस उप निरीक्षक, म.सु.प. करंजी जि. यवतमाळ | ०३/०७/१९६७ | ३१/०७/२०२५ |
| ५. | श्री. विजय किसन राठोड, पोलीस उप निरीक्षक, पोस्टे. कळंब | ०९/०७/१९६७ | ३१/०७/२०२५ |
| ६. | श्री. प्रदिपसिंग रामकिसन चव्हाण, पोलीस उप निरीक्षक, कोर्ट पैरवी अधिकारी, यवतमाळ | ०९/०७/१९६७ | ३१/०७/२०२५ |
| ७. | श्री. धरमसिंग जोहरा उईके, पोलीस उप निरीक्षक, पोस्टे.बाभुळगाव | ०१/०१/१९६८ | ३१/१२/२०२५ |

सर्व संबंधितांनी नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

**(कुमार चिंता )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

वरील नमूद सर्व अधिकारी.

**प्रत-माहिती व उचित कार्यवाहीस्तव :-**पोउपअधी-मुख्या/उपविपो-यवतमाळ, उमरखेड, वणी, / ठाणेदार, पोस्टे. यवतमाळ ग्रामिण/पोस्टे. उमरखेड/पोस्टे. कळंब/पोस्टे. बाभुळगाव/पोनि-जि.वि.शाखा/ म.पो.केंद्र,करंजी/नियंत्रण कक्ष/प्र.लि.लेखा शाखा/कक्ष-३/कक्ष-४/कक्ष-१२/कक्ष-१४/कक्ष-१५/कक्ष-१६/कक्ष-१७ /कक्ष-२४/ कक्ष-२०/पोलीस कल्याण शाखा

क्र.:-पोअय/कक्ष-9(2)/सेनि.जून.काल्पनिक वेवा./1718 /2025.
कार्यालय, पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल.आय.सी.चौक ता.व जि.यवतमाळ पिन कोड 445001
Email -sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- -5 FEB 2025

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : वेतन-2023/प्र.क्र.13/सेवा-3, दिनांक 28 जून, 2023 अन्वये, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक 1881/2023 व इतर याचिकांमध्ये दिनांक 16/02/2023 रोजी दिलेल्या निर्णयामध्ये दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या कर्मचा-यांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृती वेतन निश्चित करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. यवतमाळ जिल्हा पोलीस दलामधील खालील नमूद पोलीस अंमलदार हे रकाना क्रमांक 4 मधे दर्शविलेल्या दिनांकास नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असून या कार्यालयातील उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे त्यांना वरील नमूद शासन निर्णया नुसार दिनांक 01 जुलै, रोजीची काल्पनिक वेतन वाढ मंजुर करण्यांत येत आहे. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक 16/02/2023 रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्रमांक 9 मध्ये नमूद केले आहे की, This notional inclusion of the annual increement would be considered for re-calculating their pension, gratuity, earned leave, commutation of pension benefits etc. त्यानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदारांना लाभ अनुज्ञेय राहतील.

| अ. क्र. | सेनि.पोलीस अंमलदार यांचे नांव/पद/ब.नं. व नेमणूक | नेमणुक | जन्म दिनांक | से.नि.दिनांक | सेवानिवृत्तचे रोजीचे शेवटचे वेतन मुळ वेतन 06 वेतन आयोग नुसार | 3% वेतन | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक 28 जून,2023 रोजी नुसार दि. 01 जुलै 2024 रोजीची काल्पनिक वेतनवाढ दिल्यानंतरचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सपोउनि.516/तुकाराम देबाजी पवार | बिटरगांव पो.स्टे | 01-07-1951 | 30/06/2009 | 12470 + 2800 ग्रेड पे | 460/- | 12930 +2800 ग्रेड पे |

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक 16/02/2023 रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्रमांक 9 मध्ये नमूद केले आहे की, This notional inclusion of the annual increement would be considered for re-calculating their pension, gratuity, earned leave, commutation of pension benefits etc. नुसार लाभ अनुज्ञेय करण्यांत यावे. त्यास अनुसरुन यवतमाळ जिल्हा पोलीस दलामधील उपरोक्त नमूद सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदारांना सदरहू लाभ अनुज्ञेय राहतील.

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

प्रति,

पेन्शन लिपीक (कक्ष 16 )/वेतन लिपीक-1 (कक्ष-18 ) / राजपत्र लिपीक/यांना माहितीस व उचित कार्यवाहीस्तव.

क्रमांकः पोअय/कक्ष-१२/निलं.मुक्त/पो.अंमलदार/ 1742 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- - 5 FEB 2025

## निलंबन मुक्त आदेश

**संदर्भ** :- १) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/११/२२/६/२५२/२०२१, दिनांक १०/०२/२०१६.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/११/२२/६/२५२/२०१२, दिनांक २७/०९/२०२१.

**विषय** :- निलंबनाचे पुर्नविलोकन करुन पुन:स्थापीत करण्याबाबत.

---ooo---

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वरिल संदर्भीय परिपत्राकातील मार्गदर्शन सुचनेनुसार लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, फौजदारी प्रकरण व प्रशासकीय कारणास्तव या घटकाचे आस्थापनेवरील निलंबित असलेल्या पोलीस अंमलदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयात तसेच प्रशासकीय संबधाने निलंबन प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी पोलीस अधीक्षक, यवतमाळ, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ व पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ अशी समिती गठीत करण्यात आली असुन दिनांक ०५/०२/२०२५ रोजी निलंबन आढावा घेण्यात आला आहे.

निलंबीत पोलीस अंमलदार यांचे निलंबन प्रकरणाचा आढावा घेवुन यांना त्यांचे विरुध्द सुरु असलेल्या न्यायालयीन कार्यवाहीच्या व प्राथमिक/ विभागीय चौकशी कार्यवाहीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन कार्यवाहीस बाधा न येता त्यांना कर्तव्यावर हजर झाल्याचे दिनांकापासुन निलंबनातुन मुक्त करण्यात येऊन निलंबन मुक्ततेनंतर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निलंबित पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे नाव व पदनाम | निलंबन दिनांक | निलंबनातुन मुक्त केल्यानंतर नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | पोना/२२८० पंकज उंबरकर | ०८/१०/२०२४ | पो.स्टे. दारव्हा |
| ०२ | पोशि/२४७९ विशाल गेडाम | ०८/१०/२०२४ | पो.स्टे. महागाव |
| ०३ | पोहवा/२२५४ दिनेश नाकतोडे | १७/११/२०२४ | पो.स्टे. दारव्हा |
| ०४ | पोना/१७५५ हदयनाथ वानखडे | १७/११/२०२४ | पो.स्टे. पुसद शहर |
| ०५ | चापोशि/२६२७ संजय तारे | १७/११/२०२४ | पो.स्टे. दराटी |

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नेमणुकीच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. ते ज्या तारखेस हजर राहतील त्या तारखेपासुन त्यांना निलंबनातुन मुक्त असे समजण्यात येईल.

Kumar

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

१) पोना/२२८० पंकज उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल गेडाम, ३) पोहवा/२२५४ दिनेश नाकतोडे, ४) पोना/१७५५ हदयनाथ वानखडे, ५) चापोशि/२६२७ संजय तारे, सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.**
२/- उपरोक्त आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावी.

**प्रत :- प्रभारी अधिकारी, पो.स्टे. दारव्हा/ महागाव/ पुसद शहर/ दराटी.**
२/- नमुद पोलीस अंमलदार हे नेमणुकीच्या ठिकाणी पोलीस स्टेशन येथे हजर झाल्याबाबतची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

**प्रत** :-पोउपअधि(मुख्या) यवतमाळ/पो.नि.कक्ष यवतमाळ/रा.पो.नि.पो.मुख्या. यवतमाळ/कर्म.वेतन लिपीक(कक्ष-१८)/कर्म.आस्थापना लिपीक (कक्ष-९)/कक्ष-०९-०४/कक्ष-०९-०५/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/नोंदणी लिपीक, पो.अ.कार्या. यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.

**प्रतीलीपी :-** अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ/पोलीस उप अधीक्षक (मुख्या.) यवतमाळ.

कक्ष - 9

1700

क्र: पोअय/कक्ष १२/मपोशि/२४०५ कोडापे/अमान्य/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- -5 FEB 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महत्वाचे / कालमर्यादा**

**संदर्भ :-** पोलीस स्टेशन पाटण यांचे पत्र क्र. ५२०/२०२४, दिनांक २३/०९/२०२४.

**विषय :- न्यायालयाचे न्यायनिर्णयान्वये शिक्षा रदद करणेबाबत.**

---ooo---

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते की, अर्जदार मपोशि/२४०५ निलम अशोक कोडापे, नेमणुक पो.स्टे. पाटण यांचेविरुध्द पो.स्टे. वणी येथे दाखल अप.क्र. ८४६/२०१८ कलम १६० भादवि अन्वये दिनांक १८/०८/२०१८ रोजी दाखल गुन्हयामध्ये न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र. ०३) वणी यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे आदेशान्वये निर्दोष मुक्तता केल्याने त्यांना या कार्यालयाकडुन प्राथमिक चौकशीअंती देण्यात आलेल्या "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे" ही शिक्षा रदद करणेबाबत विनंती अर्ज या सादर केला आहे.

त्यानुसार अर्जदार मपोशि/२४०५ निलम अशोक कोडापे, नेमणुक पो.स्टे. पाटण यांना त्यांनी त्यांचे कर्तव्यात केलेल्या कसुरीप्रकरणी प्राथमिक चौकशीअंती त्यांची कर्तव्यातील कसुरी सिध्द झाल्याने त्यांना "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे" ही शिक्षा देण्यात आली आहे. विभागीय कार्यवाही व न्यायालयीन प्रक्रीया दोन्ही बाबी वेगवेगळया विषयाशी संबधीत असल्यामुळे त्यांची शिक्षा रदद करणेबाबतची विनंती पुनश्य **अमान्य** करण्यात येत आहे.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

**प्रति,**

**मपोशि/२४०५ निलम कोडापे,**
**नेमणुक पो.स्टे. पाटण.**

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाटण.**
२/- सदर पत्राची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**प्रत :- कक्ष-०९-०५/कक्ष-१४, नोंदणी लिपीक** यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.

क्रमांकः पोअय/कक्ष-१२/निलं.मुक्त/क.श्रे.लि. सिददीकी/ 1741 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 5 FEB 2025

## निलंबन मुक्त आदेश

संदर्भ :- १) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/११/२२/६/२५२/२०२१, दिनांक १०/०२/२०१६.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/११/२२/६/२५२/२०१२, दिनांक २७/०९/२०२१.

विषय :- निलंबनाचे पुर्नविलोकन करुन पुनःस्थापीत करण्याबाबत.

---ooo---

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वरिल संदर्भीय परिपत्राकातील मार्गदर्शन सुचनेनुसार लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, फौजदारी प्रकरण व प्रशासकीय कारणास्तव या घटकाचे आस्थापनेवरील निलंबित असलेल्या पोलीस अंमलदार व लिपीक कर्मचारी यांचे विरुध्द दाखल गुन्हयात तसेच प्रशासकीय संबधाने निलंबन प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी पोलीस अधीक्षक, यवतमाळ, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ व पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ अशी समिती गठीत करण्यात आली असुन दिनांक ०५/०२/२०२५ रोजी निलंबन आढावा घेण्यात आला आहे.

निलंबीत पोलीस अंमलदार व लिपीक कर्मचारी यांचे निलंबन प्रकरणाचा आढावा घेवुन यांना त्यांचे विरुध्द सुरु असलेल्या न्यायालयीन कार्यवाहीच्या व प्राथमिक/ विभागीय चौकशी कार्यवाहीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन कार्यवाहीस बाधा न येता त्यांना कर्तव्यावर हजर झाल्याचे दिनांकापासुन निलंबनातुन मुक्त करण्यात येऊन निलंबन मुक्ततेनंतर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निलंबित पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे नाव व पदनाम | निलंबन दिनांक | निलंबनातुन मुक्त केल्यानंतर नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | क.श्रे.लि./ म.शहीफ म. हनीफ सिददीकी | ०४/११/२०२४ | पो.अ. कार्या. यवतमाळ |

उपरोक्त नमुद लिपीक कर्मचारी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नेमणुकीच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. ते ज्या तारखेस हजर राहतील त्या तारखेपासुन त्यांना निलंबनातुन मुक्त असे समजण्यात येईल.

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

**क.श्रे.लि./ म.शहीफ म. हनीफ सिददीकी,**
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.**

२/- उपरोक्त आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावी.

1700
क्र: पोअय/कक्ष १२/मपोशि/२४०५ कोडापे/अमान्य/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- - 5 FEB 2025

**महत्वाचे / कालमर्यादा**

**संदर्भ :-** पोलीस स्टेशन पाटण यांचे पत्र क्र. ५२०/२०२४, दिनांक २३/०९/२०२४.

**विषय :- न्यायालयाचे न्यायनिर्णयान्वये शिक्षा रदद करणेबाबत.**

---ooo---

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते की, अर्जदार मपोशि/२४०५ निलम अशोक कोडापे, नेमणुक पो.स्टे. पाटण यांचेविरुध्द पो.स्टे. वणी येथे दाखल अप.क्र. ८४६/२०१८ कलम १६० भादवि अन्वये दिनांक १८/०८/२०१८ रोजी दाखल गुन्हयामध्ये न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र. ०३) वणी यांचे दिनांक २८/०८/२०१९ चे आदेशान्वये निर्दोष मुक्तता केल्याने त्यांना या कार्यालयाकडुन प्राथमिक चौकशीअंती देण्यात आलेल्या "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे" ही शिक्षा रदद करणेबाबत विनंती अर्ज या सादर केला आहे.

त्यानुसार अर्जदार मपोशि/२४०५ निलम अशोक कोडापे, नेमणुक पो.स्टे. पाटण यांना त्यांनी त्यांचे कर्तव्यात केलेल्या कसुरीप्रकरणी प्राथमिक चौकशीअंती त्यांची कर्तव्यातील कसुरी सिध्द झाल्याने त्यांना "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे" ही शिक्षा देण्यात आली आहे. विभागीय कार्यवाही व न्यायालयीन प्रक्रीया दोन्ही बाबी वेगवेगळया विषयाशी संबधीत असल्यामुळे त्यांची शिक्षा रदद करणेबाबतची विनंती पुनश्य **अमान्य** करण्यात येत आहे.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

**प्रति,**

**मपोशि/२४०५ निलम कोडापे,**
**नेमणुक पो.स्टे. पाटण.**

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाटण.**

२/- सदर पत्राची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**प्रत :- कक्ष-०९-०५/कक्ष-१४, नोंदणी लिपीक** यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.